दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

• संपादक : काकासाहेब नवले • RNI No. MAHMAR /2019/82605 • वर्ष ६ वे • अंक १५२ • सोमवार, १७ मार्च २०२५ • www.rashtrasahyadri.com • पाने ८ • मूल्य रु. ४.००

## आठ महिन्यापासून अंतराळात अडकलेल्या सुनीता विल्यम्सच्या परतणार!





**वॉशिंग्टन** : नासाचे अंतराळवीर सुनिता विल्यम्स आणि बूच विल्मोर हे फक्त ८ दिवसांच्या अंतराळ मोहिमेसाठी गेले होते. मात्र गेल्या ८ महिन्यांपासून अंतराळात अडकलेत. त्यांना पृथ्वीवर सुखरुप परत आणण्यासाठी नासा आणि स्पेसएक्सने क्रू १० मिशन लाँच केले आणि क्रू १० आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात दाखल झाले.अंतराळात सुनिता विल्यम्स आणि बूच विल्मोर यांच्याजवळ पोहोचताच सर्वांनीच आनंद व्यक्त केला. एकमेकांना मिठी मारून अंतराळवीरांनी आनंद साजरा केला. शनिवारी नासाने स्पेस एक्स क्रू कॅप्सूल लाँच केले. हे यान रविवारी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचलं. अंतराळ स्थानकात गेल्या ८ महिन्यांपासून अडकलेल्या दोन्ही अंतराळवीरांना लवकरच पृथ्वीवर आणले जाईल. १९ मार्चला ते पृथ्वीवर उतरतील असे सांगण्यात आले आहे.

### झापुक । zupuk

राजे! अन्याय, अत्याचाराच्या
विरोधात लढणारे विचार
होऊ लागले म्यान
खाण्या-पिण्यावरच
त्यांचे केंद्रीत होऊ
लागले ध्यान
अविवेकी विचारांमुळे
शक्ती त्यांची
आटू लागली
वैचारिक तलवार
सोडून हाती येऊ
लागली बाटली
आया-बहिणींवर डोळा
ठेवणारे गल्लोगल्ली टपलेले
आहेत वासनांध गिधाडे
त्यांनाही आया-बहिणी
असल्याचे शिकवावे
लागतील चांगलेच धडे

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

## महत्वाचे...

### विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेलेला कृष्णा तोल घसरून पडला

**ठाणे :** पाणी पुरवठा करणाऱ्या शहापूर तालुक्यात भीषण पाणी टंचाईचा सामना गावकऱ्यांना करावा लागत असून, शाळा सुटल्यानंतर इयत्ता ८ वीत शिकणारा कृष्णा सन्या शिद हा १४ वर्षीय मुलगा गावात पाणी टंचाई असल्याने विहीरीवर गेला असता, पाणी भरत असताना त्याचा अचानक तोल गेल्याने तो विहिरीत पडला. ही भीषण वास्तव समोर आणणारी घटना शहापूर तालुक्यातील माळ ग्रामपंचायत हद्दीतील शिदपाडा येथील विहिरीत घडली. विहिर कोरडी असल्याने त्याला विहिरीतील दगडांचा मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला. दोरीच्या सहाय्याने त्याला लगेच बाहेर काढले व उपचारासाठी शासकीय रुग्णालयाला रवाना केले. सध्या तो जखमी असून त्याच्यावर उपचार चालू आहेत.

### म्युझिक कॉन्सर्टमध्ये आग : ५० जण होरपळून ठार

**नवी दिल्ली :** शनिवारी रात्री एका नाईट क्लबला लागलेल्या आगीत किमान ५० जणांचा मृत्यू झाला असून १०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, कोकानी शहरात आयोजित एका हिप हॉप संगीत कार्यक्रमादरम्यान आगीची भीषण घटना घडली. सुमारे ३०,००० लोकसंख्या असलेल्या या शहरातील नाईट क्लबमध्ये प्रसिद्ध हिप-हॉप जोडी DN चा संगीत कार्यक्रम सुरू असताना आग लागली. या कॉन्सर्टसाठी क्लबमध्ये १५०० लोक जमले होते. असे मानले जात आहे की कार्यक्रमादरम्यान कोणीतरी क्लबच्या आत फटाके फोडले, ज्यामुळे आग लागली. आग लागल्यानंतर गोंधळ उडाला आणि चेंगराचेंगरीत काही लोक चिरडले गेले. युरोपियन देश नॉर्थ मॅसेडोनियामध्ये ही घटना घडली. जखमींना राजधानी स्कोप्जेसह देशभरातील विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यामध्ये अनेक स्वयंसेवी संस्थांचीही मदत घेतली जात आहे.

### २६ /११ चा मास्टरमाईंड हाफिज सईदचा खात्मा?

**लाहोर** : २६/११ चा मास्टरमाईंड लष्कर-ए-तोयबाचा हाफिज सईद आणि त्याचा साथीदारावर हल्ला झाल्याची बातमी मिळाली आहे. या हल्ल्यात हाफिज सईद मारला गेला असल्याचा दावा केला जात आहे. तसेच लष्कर-ए-तोयबाचा वरिष्ठ नेता फैसल नदीम उर्फ अबू कताल याचाही या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे.

झेलममधील मंगला बायपासजवळ मोटारसायकलवरून आलेल्या हल्लेखोरांनी त्यांच्या कारवर गोळीबार केला. या गोळीबारात एक जण जखमी झाल्याचे सांगितले जात आहे, तर दोघांचा मृत्यू झाला आहे. अबू कताल हा सईदचा पुतण्या आहे, त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच जमात-उद-दावाचा एक बडा नेताही यात जखमी झाला असून त्याची ओळख लपवून ठेवण्यात आल्याचा दावा पाकिस्तानी हँडलनी केला आहे.

# आम्ही शांततेसाठी प्रयत्न केले पण... पाकिस्तानने विश्वासघात केला

## अमेरिकन पॉडकास्टर लेक्स फ्रीडमन यांच्या पॉडकास्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दावा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** भारताने शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. मात्र, आम्हाला प्रत्येकवेळी शत्रुत्व आणि विश्वासघाताचा सामना करावा लागला, असे स्पष्ट करत पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानशी संबंध सुधारण्याच्या आपल्या प्रयत्नांचा उल्लेख केला. तसेच जागतिक स्तरावर शांततेसाठी भारताची वचनबद्धता कायम असल्याचे अधोरेखित केलं. अमेरिकन पॉडकास्टर लेक्स फ्रीडमन यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबरचा पॉडकास्ट आज प्रसारित झाला. या पॉडकास्टमध्ये **(पान ४ वर)**

### • गोधरा हत्याकांडाची कहाणी खोटी

२००२ च्या दंगली भोवतीच्या चर्चेला खोटी कहाणी निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. २००२ पूर्वी गुजरातमध्ये २५० हून अधिक दंगली झाल्या होत्या आणि जातीय हिंसाचार वारंवार होत होता. २००२ पूर्वी देशात सतत दहशतवादी हल्ले आणि अस्थिरतेचे वातावरण होते, त्यामुळे तणाव शिगेला पोहोचला होता. तेव्हा जगातही दहशतवादी कारवायांमध्येही वाढ दिसून आली होती. १९९९ मध्ये कंधार अपहरण प्रकरण झालं होतं, २००० मध्ये लाल किल्ल्यावर हल्ला झाला होता आणि २००१ मध्ये आपल्या संसदेवर हल्ला झाला होता. तो काळ मोठ्या आव्हानांचा होता. पण २००२ नंतर गुजरातमध्ये एकही मोठी दंगल घडलेली नाही. आता राज्यात कायमस्वरूपी शांतता आहे. २००२ ची आतापर्यंतची मोठी दंगली होती ही धारणा चुकीची आहे. वास्तविकता अशी आहे की २००२ पूर्वी गुजरातमध्ये जातीय दंगली झाल्या होत्या. तरीही २००२ प्रमाणे त्या कधीही आंतरराष्ट्रीय बातम्या बनल्या नाहीत.

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### • ही वेळ युद्धाची नाही

रशिया आणि युक्रेन हे दोन्ही देश मित्र राष्ट्र आहेत. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याबरोबर बसून मी त्यांना म्हणू शकतो की ही युद्धाची वेळ नाही. तसेच युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनाही मी मैत्रीपूर्ण पद्धतीने सांगू शकतो की भाऊ, जगात कितीही लोक तुमच्याबरोबर उभे असले तरी युद्धभूमीवर कधीही तोडगा निघणार नाही, असं म्हणत रशिया आणि युक्रेन संघर्ष केवळ चर्चेनेच संपेल हे भारताने अनेक वेळा स्पष्ट केले असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकन पॉडकास्टमध्ये म्हटले आहे.

# सव्वा कोटींचे वाहने व वाळूसाठे जप्त

## वाळू तस्करांविरुद्ध अहिल्यानगर पोलिसांची मोहीम; २८ जणांना अटक



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जिल्ह्यातील वाळू तस्करांविरुद्ध विशेष मोहिम राबवली. गेल्या दोन दिवसात एकुण ११ ठिकाणी छापे टाकून २८ जणांविरुद्ध अकरा गुन्हे दाखल करत सुमारे १ कोटी २८ लाख रुपये किंमतीचे वाळू साठे व वाहने जप्त केली.

जिल्ह्याच्या उत्तर भागातील विशेषतः गोदावरी नदीपात्रात ही मोहीम राबवली गेली. जिल्ह्यातील श्रीरामपूर, शेवगाव, नेवासा, कोपरगाव, राहता व पारनेर या तालुक्यांमध्ये पोलिसांनी ही मोहीम राबवली. त्यासाठी पोलिसांची विविध पथके तयार करण्यात आली होती. जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांच्या सूचनेनुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली पोलिस अंमलदार अतुल लोटके, गणेश लोंढे, संदीप दरंदले, बीरप्पा करमल, सोमनाथ झांबरे, रोहित येमूल, भाऊसाहेब कांबळे, अमोल कोतकर, विशाल तनपुरे, रमीजराजा आत्तार, अशोक लीपाणे, उमाकांत गावडे यांच्या पथकाने श्रीरामपूर, राहता, कोपरगाव, मिरजगाव, पारनेर, नेवासा येथे सात ठिकाणी छापे टाकून १३ आरोपींविरुद्ध ७ गुन्हे दाखल केले. त्यांच्याकडून वाळू साठे व वाहने असा ८८ लाख ५३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याशिवाय श्रीरामपूर व शेवगाव तालुक्यातील वाळू तस्करांवर **(पान ४ वर)**

## एसटी निविदा घोटाळा : संशयीतांचे सी.डी.आर. तपासण्याची एसटी कर्मचारी काँग्रेसची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील १ हजार ३१० बस गाड्या भाडे तत्त्वावर घेण्याचा निर्णय प्रक्रियेत एका बड्या व्यक्तीने हस्तक्षेप केल्याची माहिती असून निविदा प्रक्रिया अंतिम करण्याच्या वेळी कुणी फोन केले याचे सी. डी. आर. तपासण्यात आले तर या प्रकरणाचा नक्की छडा लागेल, असे मत महाराष्ट्र एस. टी. कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी व्यक्त केले आहे.

महामंडळाच्या पातळीवर झालेल्या या निर्णयामुळे भविष्यात एसटीचे अंदाजे १,७०० कोटी रुपयांचे नुकसान झाले असते. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सतर्कता दाखऊन निविदेला स्थगिती दिली व चौकशीचे आदेश दिले. त्याच प्रमाणे निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली. हे वास्तव असून या पुढे अशा घटना घडू नयेत या साठी पारदर्शकता आणली पाहिजे ,असेही बरगे यांनी म्हटले आहे.

ही निविदा प्रक्रिया राबविताना महत्त्वाच्या पदावर असलेल्या बड्या हस्तीने हस्तक्षेप केला असल्याचे समजत असून आपले कार्यालयीन कामकाज संपवून घरी निघालेल्या एसटीच्या अधिकाऱ्यांना परत बोलाविण्यात आले.व बळजबरीने जास्त दर देण्याचा निर्णय घेण्यास भाग पाडले. अशी माहिती समोर आली आहे.या संदर्भातील फाईल मधील पूर्वीच्या टिप्पण्या पाहिल्या किंवा कॉल रेकॉर्डिंग तपासले तर दूध का दूध व पाणी का पाणी दिसून येईल व नक्की कोण दोषी आहे ते स्पष्ट दिसून येईल. असेही बरगे यांनी म्हटले आहे.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठका या शक्यतो मुंबईत घेतल्या जातात.या निविदेला अंतिम स्वरूप देण्यासाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशन काळात संचालक मंडळाची बैठक तातडीने नागपूर येथे घेण्यात आली. त्यासाठी एसटीच्या काही अधिकाऱ्यांना विमानाने नागपूरला बोलाविण्यात आले. एवढा खर्च व एवढी घाई कुणाला **(पान ४ वर)**

## 'खोक्या'ची आमदार धस यांच्याकडून पाठराखण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड :** भाजप आमदार सुरेश धसांनी खोक्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली. सतीश भोसले उर्फ खोक्या सध्या पोलीस कोठडीत आहे. खोक्याने ढाकणे पिता पुत्राला मारहाण केल्यानंतर त्याचे अनेक कारनामे समोर आले आहेत.खोक्या अटकेत असताना त्याच्या घरावर वनविभागाने बुलडोझर चालवला. बीडच्या शिरूर तालुक्यातील झापेवाडी शिवारात असलेलं सतीशच घर वनविभागाच्या जागेत असल्याने ही कारवाई करण्यात आली. मात्र या गोष्टीवरून भाजप आमदार धस यांनी खोक्याची पाठ राखण केल्याचे दिसून आले. आज सुरेश धसांनी त्याच्या कुटुंबीयांची भेट घेत संवाद साधला. वनविभागाने नोटीस न देता घर पाडल्याचा आरोप धसांनी केला आहे.



सतीश ऊर्फ खोक्या भोसले यांचे घर वनविभागाने कोणत्याही नोटिशीशिवाय पाडले, असा गंभीर आरोप माजी आमदार सुरेश धस यांनी केला आहे. धस यांनी प्रशासनाच्या या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत हे कोणत्या नियमाअंतर्गत करण्यात आले, याचा जाब विचारला आहे. सतीश भोसले यांनी मारहाण केली त्याचे समर्थन नाही त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे तो अटकही आहे. मात्र त्याचे घर पाडणे चुकीचे आहे असेही सुरेश धस म्हणाले. आज सुरेश धस यांनी सतीश भोसले उर्फ खोक्याच्या पाडलेल्या घराची पाहणी केली तसेच त्यावेळी पुनर्वसन करण्याचा शब्दही दिला.

सुरेश धस म्हणाले, एवढा मोठा नाही तो जेवढा मोठा करुन दाखवला, जसा गुन्हा होता तशी शिक्षा मिळायला पाहिजे. आता त्याच्या कुटुंबीयांकडे घरंही नाही. कुटुंबीयांचं पुनर्वसन करण्याचा विचार करु. १०० वर्षापासून ते येथे राहत होते. त्याचे घर पाडलं गेलं. वनविभागाने नोटीस न देता त्याचे घर पाडले आहे. वनविभागाने कोणत्या नियमाने केले त्याची उत्तर मिळाली पाहिजे. **(पान ४ वर)**

## बीडमध्ये गुंडगिरीचा पुन्हा बळी

# ट्रक मालकाच्या बेदम मारहाणीत ड्रायव्हरचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बीड :** मधून गुंडगिरीच्या बातम्या काही कमी होण्याचे नाव घेत नाही. सरपंच देशमुख हत्याकांडानतर बीडमधून गुन्हेगारीच्या अनेक बातम्या समोर आल्या. त्यातीलच आणखी एक अपहरण आणि मारहाणीची बातमी बीडच्या आष्टी तालुक्यातील समोर आली आहे.

बीडमध्ये आष्टी तालुक्यात ट्रक मालकाकडून चालकाला डांबून ठेवत बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत चालकाचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येची पुनरावृत्ती झाल्याचा संशय सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी व्यक्त केला.

बीडच्या आष्टी तालुक्यातील पिंपरी घुमरी येथे एका ट्रक मालकाने चालकाला दोन दिवस डांबून ठेवत बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही मारहाण इतकी गंभीर होती की त्यात चालकाचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी आष्टी पोलिसांनी ट्रक मालकाला ताब्यात घेतले. महाराणी ठार झालेला विकास बनसोडे हा पिंपरी घुमरी येथील क्षीरसागर नावाच्या व्यक्तीचा चालक म्हणून कामाला होता.

त्यांच्यात वाद झाल्याने क्षीरसागरने त्याला डांबून ठेवत बेदम मारहाण केल्याचा आरोप विकासचा भाऊ आकाश बनसोडे यांनी केला. या प्रकरणात आष्टी पोलिसांनी एका संशयीताला ताब्यात घेतले आहे. या घटनेचा अधिक तपास सुरू असून या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे **(पान ४ वर)**

# शेतकरी बिबट्याच्या झटापटीत बिबट्या ठार!

## कुत्र्याला वाचविण्यासाठी शेतकरी आक्रमक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**चिपळूण :** कुत्र्याची शिकार करण्यासाठी आलेल्या बिबट्याने शेतकऱ्यावर हल्ला केला. स्वतःच्या बचाव दरम्यान शेतकऱ्याने बिबट्याला धरून जमिनीवर आपटले आणि टोकदार भाल्याने त्याला जखमी केले. या झटापटी दरम्यान बिबट्याचा जागीच मृत्यू झाला. चिपळूण तालुक्यातील मौजे वारेली येथे शनिवारी रात्री साडेअकरा वाजता हा प्रकार घडला.

तोंडली वारेली परिसरात मागील काही दिवसापासून बिबट्याचा मुक्त संचार सुरू होता. तोंडली वारेली गावच्या सीमेवर आशिष शरद महाजन (वय वर्ष ५५) या शेतकऱ्याचे घर आहे. या शेतकऱ्याकडे काही जनावरे आणि पाळीव कुत्रा आहे. शनिवारी रात्री ११.३० ते १२ च्या दरम्यान



महाजन यांचा कुत्रा जोरजोराने भुंकत होता. तो का भुंकतोय हे पाहण्यासाठी महाजन घराच्या बाहेर पडल्यानंतर त्यांना कुत्र्याच्या दिशेने येणारा बिबट्या दिसला. महाजन यांनी कुत्र्याला बिबट्यापासून वाचण्यासाठी प्रयत्न केल्यानंतर बिबट्याने महाजन यांच्यावरच हल्ला चढवला दोघांमध्ये झटापट झाली. या झटापटीत बिबट्याने महाजन यांच्या दोन्ही पायावर, उजव्या हाताला, तोंडावर आणि डोक्यावर जखमा केल्या रक्तबंबाळ झालेल्या महाजन यांनी बिबट्याला पकडून जमिनीवर आपटले. दोघांमध्ये सुरू असलेल्या संघर्ष महाजन यांच्या पत्नी सुप्रिया यांनी पाहिला घाबरलेल्या अवस्थेत असलेल्या सुप्रिया यांनी टोकदार भाला आणून महाजन यांना दिला.

महाजन यांनी प्रथम भाल्याने बिबट्याला मानेवर वार केले नंतर त्याच्या छातीत भाला घुसविला. या झटापटीमध्ये बिबट्याचा जागीच मृत्यू झाला. दोघांमध्ये संघर्ष सुरू असताना सुप्रिया यांनी आरडाओरड केल्यानंतर परिसरातील ग्रामस्थ ही घटनास्थळी दाखल झाले. महाजन हे गंभीर जखमी झाल्याचे पाहिले.**(पान ४ वर)**

# 'रयत'च्या सर्व शाळातून कृत्रिम बुद्धिमत्तेचा अभ्यासक्रम : शरद पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाळातून कृत्रिम बुद्धिमत्ता अभ्यासक्रमाचे शिक्षण उपलब्ध करणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज, रविवारी चिचोंडी पाटील (ता. अहिल्यानगर) येथे बोलताना सांगितले.

रयत शिक्षण संस्थेच्या चिचोंडी पाटील येथील न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची नवीन इमारत देणगीदार व ग्रामस्थांच्या मदतीतून उभारण्यात आली आहे. या इमारतीचे उद्घाटन आज शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते



बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. भगीरथ शिंदे होते. आमदार आशुतोष काळे, महेंद्र घरत, माजी आमदार बबनराव पाचपुते, राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, माजी आमदार दादा कळमकर, डॉ. अनिल पाटील, कुलगुरू डॉ सर्जेराव निमसे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ आदी उपस्थित होते. नव्या पिढीला ज्ञानाच्या सागरात आणण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजाच्या मदतीतून संस्थेची उभारणी केली. अनेक दानशूर या संस्थेला मदत करत आहेत. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी काळजी घेतली जात आहे, नव्या पिढीला ज्ञानाच्या सागरात आणण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजाच्या मदतीतून संस्थेची उभारणी केली. अनेक दानशूर या संस्थेला मदत करत आहेत. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी काळजी घेतली जात आहे, असेही शरद पवार म्हणाले.

आमदार आशुतोष काळे यांनी संस्थेच्या शाळातून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा लागेल अशी सूचना केली. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड भगीरथ शिंदे म्हणाले, संस्थेकडे ३ हजार शिक्षकांची कमतरता भासते. त्यावर ८० ते ९० कोटी रुपये खर्च होतात. राज्य सरकारने हा खर्च करायला हवा, परंतु तो संस्थेला करावा लागत आहे. यावेळी महेंद्र घरत, आबा कोकाटे, सरपंच शरद पवार, डॉ. संजय कळमकर आदींची भाषणे झाली.

चिचोंडी पाटील गाव व शाळेचा उजाड परिसर पाहून ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी ग्रामस्थांनी परिसर हिरवागार करण्याचे आव्हान स्वीकारावे, असे आवाहन केले.

# संपादकीय

## लोकसंख्या नियंत्रण आणि मतदारसंघ पुनर्रचना

अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारने मध्ये १९७१ च्या जनगणनेच्या आधारे लोकसभा व विधानसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेवरील स्थगिती २०२६ पर्यंत वाढवली होती. २१ ऑगस्ट २००१ रोजी लोकसभेत यासंदर्भात घटनादुरुस्ती विधेयक सादर करताना तत्कालीन केंद्रीय कायदे मंत्री अरुण जेटली म्हणाले होते की मतदारसंघ पुनर्रचना पुढील २५ वर्षांसाठी स्थगित करावी. कारण काही राज्यांनी कुटुंब नियोजन कार्यक्रम अतिशय प्रभावीपणे आहे आणि काही राज्ये त्यात अपयशी ठरली आहेत.त्यानंतर ज्येष्ठ काँग्रेस नेते शिवराज पाटील यांनी कुठल्या राज्यात किती जागा वाढवल्या जाव्यात यासंदर्भात एक सूत्र मांडले. त्यानुसारच भविष्यात जागा वाढवण्यास सुचवले होते. जेणेकरून ज्या राज्यांनी लोकसंख्या यशस्वीरित्या नियंत्रित केली आहे त्यांचं नुकसान होऊ नये.मतदारसंघ पुनर्रचनेवरून दक्षिण भारतात वादळ निर्माण आहे. दक्षिणेकडील राज्यांनी लोकसंख्या नियंत्रित ठेवली आहे. त्यामुळे मतदारसंघ पुनर्रचनेनंतर या राज्यांमधील लोकसभेच्या जागा वाढणार नाहीत. किंवा वाढल्या तरी त्यात अंशतः वाढ दिसेल. त्याउलट उत्तर प्रदेश व बिहारसह उत्तर भारतातील अनेक राज्यांची लोकसख्या कित्येक कोटींनी वाढली आहे. या राज्यांच्या लोकसभा जागा आधीपासूनच जास्त आहेत, त्यात आता बरीच वाढ होईल. दक्षिण भारतातील राज्यांनी लोकसंख्या-आधारित मतदारसंघ पुनर्रचनेला विरोध केला आहे.तमिळनाडूचे मुख्यमंत्री व द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे प्रमुख एम. के. स्टॅलिन यांनी केंद्र सरकारविरोधात आवाज उठवला आहे. चेन्नई येथे नुकत्याच झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत स्टॅलिन यांनी केंद्र सरकारला सुचवलं आहे की २०२६ व त्यानंतरची ३० वर्षे मतदारसंघ पुनर्रचनेसाठी १९७१ च्या जनगणनेचाच असायला हवा.घटनादुरुस्ती विधेयकावर २१ ऑगस्ट २००१ रोजी लोकसभेत मतदान पार पडलं होतं. त्यावेळी चर्चेत भाग घेत शिवराज पाटील यांनी विध्येकाच्या बाजूने मतदान केलं आणि ते म्हणाले, काँग्रेस पक्ष या विधेयकाच्या बाजूने आहे. मात्र, पाटील यांनी आणखी एक गोष्ट नमूद केली की भारतातील खासदारांना मोठ्या संख्येने लोकांचे प्रतिनिधित्व करावे आहे. कारण आपण अजूनही १९७१ च्या जनगणनेची आकडेवारी वापरत आहोत. त्यामुळे त्यांनी यासंबंधीचे सूत्र मांडले होते. शिवराज पाटील यांनी सुचवले होते की ज्या राज्यांनी त्यांची लोकसंख्या नियंत्रित ठेवली आहे त्या राज्यांमधील जागांची संख्या देखील वाढवावी (त्यासाठीचं विशिष्ट सूत्र वापरून) जेणेकरून तिथल्या खासदारांना जास्त लोकसंख्येचं प्रतिनिधित्व करावं लागणार नाही. तर, नियंत्रणात ठेवण्यात अपयशी ठरलेल्या, कुटुंब नियोजन करू न शकलेल्या राज्यांच्या जागा त्याच प्रमाणात वाढवाव्यात. जेणेकरून हे सूत्र सर्व राज्यांसाठी स्वीकार्य ठरेल. शिवराज पाटील व काँग्रेसने विधेयकाला त्यावेळी पाठिंबा दिला असला तरी पाटील यांनी जेटली यांच्याशी असहमती दर्शवली होती. ते म्हणाले होते, जागा गोठवल्याने कुटुंब नियोजनाला प्रोत्साहन मिळेल. १९७५ मध्ये देशाची लोकसंख्या ७५ कोटी इतकी होती. आज भारताची लोकसंख्या १०० कोटींहून अधिक आहे. २०२६ मध्ये भारताची लोकसंख्या १४० कोटींहून अधिक असेल. जागा गोठवल्यामुळे लोकसंख्या वाढणार नाही असा विचार करणं योग्य नाही. त्याचबरोबर दोनपेक्षा जास्त मुलं असलेल्या लोकांना निवडणूक लढवू न देण्यासारखे इतर कायदे लोकसंख्या नियंत्रणासाठी वास्तववादी उपाय ठरतील.

# मुळाच्या पाण्यापासून शेतकरी वंचित

## दुसरीकडे मात्र शेतात पाण्याचा अपव्यय



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव:-** मुळा कालव्यातून शेतीसाठी सुरू असलेले आवर्तन पाटबंधारे विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे पुर्णपणे कोलमडले असून लोळेगाव, सामनगाव व मळेगावच्या टेलच्या भागातील शेतकऱ्यांचे भरणे बाकी असताना वरच्या भागातील मायनर उघडून टेलचे पाणी बंद करण्यात आले आहे.हातातोंडाशी आलेली पीके जळून चालली असताना पैसे भरूनही हेडच्या शेतकऱ्यांची, पाटबंधारे अधिका-यांची व पाणी वापर संस्था पदाधिकाऱ्यांची पाण्यासाठी विनवणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.मुळा धरणाच्या उजव्या कालव्यातून सध्या शेतीसाठी आवर्तन सुरू आहे. उन्हाचा कडाका वाढल्याने उन्हाळी कांदा,ऊस,भूईमूग,बाजरी व चारा पिकांसाठी शेतकऱ्यांनी पाणी वापर संस्थाकडे पैसे भरून मोठ्या प्रमाणात पाणी मागणी नोंदवली संस्थांनी देखील पाणी मागणी पाटबंधारे विभागाकडे नोंदवली आहे. मात्र नियमानुसार टेल टू हेड पद्धतीने संस्था व शेतकऱ्यांना पाणी मिळणे अपेक्षित असताना हेडच्या भागातील शेतकरी धनदांडगे शेतकरी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून कालव्याच्या क्षमतेएवढे आवश्यक पाणी खाली देत नाहीत. त्याचा परिणाम टेलच्या भागातील शेतकऱ्यांना आपसात संघर्ष करावा लागत आहे शिवाय मुबलक पाणी असताना व रितसर पाणीपट्टी भरूनही शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. उन्हाळी पिकें जळून चालली असताना बळी तो कान पिळी या पाणी वापर प्रवृत्तीपुढे टेलचे शेतकरी हतबल झाले आहेत. भातकुडगाव शाखा कालव्या अंतर्गत लोळेगाव, सामनगाव व मळेगावचे शेतकरी व स्वामी समर्थ पाणीवापर संस्थेचे ७०-८०एकर क्षेत्र पाण्यापासून वंचित असताना देडगाव मायनर उघडण्यात आले आहेत.यामुळे संतप्त झालेल्या या भागातील शेतकऱ्यांनी खासदार निलेश लंके व कार्यकारी अभियंता सायली पाटील यांचेकडे गजानन तागड,गोकुळ पठाडे सुरेश देशमुख सचिन निकम भाऊसाहेब घुगरे ,सोमनाथ नवल रामदास कुटे, बाजीराव कोकाटे, अनिल निकम आदी शेतकऱ्यांनी दाद मागितली आहे.एकीकडे शेतकरी पाण्यापासून वंचित असताना अनेक भागातील रिकाम्या शेतात वाया गेलेल्या पाण्यामुळे मात्र तळे साचले आहे.

# शिर्डीत आंबेडकर वसाहतीच्या पुनर्वसन बैठकीचे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** आज पर्यंत विखे परिवाराने मतदारसंघातील प्रत्येक नागरिकांच्या सुख. दुःखात सहभागी होऊन त्यांना सन्मान दिला आहे त्यांच्यासाठी विखे परिवार हाच त्यांचे भवितव्य घडू शकतो. विस्थापित लोकांचे खांद्यावरील पुसून पुनर्वसन घडवता येत नाही. जे स्वयंघोषित पुढारी त्या ठिकाणी गेले त्यांनी साधी किराण्याची पिशवी नेली नाही. मात्र फोटोग्राफर नेण्यास विसरले नाही. हे फोटो काढणारे नेते पुन्हा तुम्हाला दिसणार नाही असे वक्तव्य डॉ. सुजय विखे यांनी केले.

पुनर्वसन करताना ज्यांचेवर एका पेक्षा अनेक गुन्हे दाखल आहेत त्यांना तडीपारीचे प्रस्ताव असुन यासाठी युद्ध पातळीवर काम सुरू आहे.

डॉ. सुजय विखे यांनी काल शिर्डी येथे आयोजित आंबेडकर नगर वसाहतीच्या पुनर्वसन संदर्भात घेतलेल्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ते म्हणाले की, आकरा चारीवरील काही हुशार लोक न्यायालयात गेले. कोर्टात गेले नसते तर ही वेळ त्यांचे वर आली नसती, अनेक लोक गेले. फोटो काढले, महिला रडत होत्या त्यांना खांदा दिला. फोटो व्हीडीओ काढले त्यांची जबाबदारी संपली. गरीबा बद्दल येवढी आत्मीयता होती तर किराणा का नेला नाही. गोरगरीबांच्या अश्रू चा वापर स्वार्थासाठी करणारे आपल्या येथे लोक आहेत त्यातले आम्ही नाहीत. संस्थानचे अध्यक्ष स्व. जयंत ससाणे असताना लक्ष्मीनगर वासियांना घरे बाधून देणार तेव्हा त्यांनी घरे घेतली असती तर आज ते चांगल्या दर्जाच्या घरात रहात असते, आंबेडकर नगरच्या १४० कुटुंबांनी घरासाठी अर्ज केले आहेत. ती यादी पोलीस स्टेशनला जाणार आहे. ज्याचे वर गुन्हे दाखल असेल त्याला घर मिळणार नाही. गुन्हेगारांना शिर्डीत थांबू न देणार नाही. मला मतदान पडले काय अन नाही पडले काही फरक पडत नाही.



# अबॅकस म्हणजे बुद्धीचा कस : अ‍ॅड. देशमुख



कुकाणा : यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान पत्र व सन्मान चिन्ह देवून गौरव करतान मान्यवर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कुकाणा - विद्यार्थ्यांच्या विकास करत असताना त्यांना शिक्षणा बरोबर योग्य संस्कार मिळाल्यास येणाऱ्या काळातील पुढील पिढी सुद्धा सुसंस्कारी होईल व देशाचे चांगले नागरिक बनतील,जी स्टार प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लास व जी स्टार क्लासेस विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देऊन मार्गदर्शन करते हे कौतुकास्पद असून अबॅकस म्हणजे आपल्या बुद्धीचा कस आहे असे प्रतिपादन अ‍ॅड. हिम्मतसिंह देशमुख केले.

नेवासा तालुक्यातील कुकाणा येथील विठ्ठल रुक्मिणी सभागृहात जी स्टार प्रो ऍक्टिव्ह अबॅकस क्लास व जी स्टार क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने कुकाणा येथे अबॅकस, नवोदय, स्कॉलरशिप या विविध शालेय स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळयाप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर सरपंच लताताई अभंग, वैशाली देशमुख, राष्ट्रवादीचे युवा नेते अब्दुलभैया शेख , ज्येष्ठ कार्यकर्ते चंपालाल बोरा, ज्येष्ठ पत्रकार प्रा. सुनील पंडित विलासराव देशमुख ,पत्रकार सोमनाथ कचरे माजी उपसरपंच आत्माराम लोंढे, गोरक्षनाथ लोंढे हे प्रमुख अतिथी होते. क्लासेसच्या संचालिका मनीषा लोंढे यांनी प्रास्ताविक केले तर संचालक अध्यापक जयदीप लोंढे यांनी स्वागत केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस करून अभिवादन केले. आली. यावेळी मान्यवरांसह जी स्टारचा सर्वे श सदावर्ते या विद्यार्थ्यांने आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितीतांचे लक्ष वेधले.यावेळी विविध स्पर्धेत यशस्वी झालेल्या एकुण १२८ विद्यार्थ्यांना गोल्ड, सिल्व्हर मेडल, सन्मान पत्र, सन्मान चिन्ह व कुकाणा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तरवडी येथील दीनमित्रकार माध्यमिक विद्यालय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या सहभागी शाळांना सन्मान चिन्ह देवून गौरविण्यात आले. यावेळी शिवाजी पवार,संपत नाईक , भगवान कचरे, अमीर शेख, अमित गुगळे, सुमित बोरा, सुमनताई लोंढे, दिपाली सदावर्ते चंद्रकला लोंढे यांच्यासह शिक्षक वृंद , पालक, विद्यार्थी, तरवडी व कुकाणा ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अध्यापक गणेश यांनी केले तर सचिन लोंढे यांनी आभार मानले.

# शिवजयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत युगपुरुष ''श्रीमंत श्री छत्रपती शिवाजी महाराज'' यांची तिथीप्रमाणे जयंती आज सोमवार दि. १७ मार्च रोजी टाकळीभान येथे मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात येणार आहे. यावेळी या जयंतीदिनी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दिनांक १७ मार्च २०२५ रोजी सकाळी ८ ते वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची पालखी मिरवणूक होईल . ९ वाजता ''श्री छत्रपती शिवाजी महाराज'' यांची महाआरती -विश्वनाथगिरीजी महाराज श्री क्षेत्र घोगरगाव देवस्थान यांच्या हस्ते होणार आहे. सायंकाळी ६.३० वाजता ''स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज'' श्रीक्षेत्र देवगड यांची भव्य मिरवणूक टाकळीभान गावात होणार आहे. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ''स्वामी महाराज'' यांचे जाहीर हरिकीर्तन होणार आहे त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. तरी समस्त ग्रामस्थांनी ह्या शिवजयंती उत्सव सोहळ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन राजमुद्रा ग्रुप, शिवजयंती उत्सव समिती व समस्त ग्रामस्थ टाकळीभान यांनी केली आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात ठार शेतकऱ्याच्या कुटुंबाची अक्षय कर्डिले यांची सांत्वन भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** घे तालुक्यातील वडनेर येथे बिबट्याच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या शेतकरी शोभाचंद सीताराम गव्हाणे यांच्या कुटुंबाची युवा भाजपा युवा जिल्हाध्यक्ष अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी सांत्वनपर भेट घेतली. यावेळी बिबट्याचे वास्तव्य असलेल्या भागात पिंजरे लावून धुमाकूळ घालणाऱ्या बिबट्यांना त्वरित जेरबंद करावे अशा वन विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी सूचना दिल्या.

राहुरी तालुक्यातील वडनेर येथील शेतकरी शोभाचंद सिताराम गव्हाणे यांच्यावर नरभक्षक बिबट्याने हल्ला केल्याने ते मयत झाल्याची घटना चार दिवसांपूर्वी होती. वडनेर सह राहुरी तालुक्याच्या बहुतांश गावामध्ये बिबट्याने हल्ला करण्याच्या घटना वाढलेल्या असून बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी मृत्युमुखी पडल्याची घटना घडल्याने शेतकरी वर्गात घबराटीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

युवा नेते अक्षय कर्डिले यांनी कार्यकर्त्यांसह सदर गव्हाणे कुटुंबाची भेट घेतली शासकीय पातळीवर मिळणारी मदत तसेच वाढत्या बिबट्याच्या हल्ल्यापासून शेतकऱ्यांचे व नागरिकांचे करण्यासाठी वनविभागाच्या उपाययोजनांची तहसीलदार व वन विभागाचे अधिकारी यांच्याशी संपर्क साधून त्यांनी माहिती घेत सूचना दिल्या. यावेळी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अमोल भनगडे, सरपंच सर्जेराव घाडगे, संदीप घाडगे, बाबुराव निमसे, माजी सरपंच आण्णासाहेब बलमे दादा हारदे, विकास कोबरणे, सतीश कोबरणे, विजय बलमे आदी उपस्थित होते.



# अखेर राहुरी पोलिसांना मिळणार नवीन घरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी शहरात सध्या महामार्गावरील तसेच शहरांतर्गत अनेक ठिकाणी अतिक्रमण हटाव मोहीम वेगाने सुरू आहे . त्यातच एक वसाहत पाडण्यास सुरुवात झाली त्याची सध्या जोरदार चर्चा सुरू झाली आहे .

गेल्या सहा ते सात दशकांहून अधिक काळापासून असलेल्या राहुरी पोलीस वसाहतीचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे . २० ते २५ वर्षांपासून राहुरी पोलीस स्टेशन लगतची पोलीस कर्मचारी वसाहत जीर्ण अवस्थेत व पूर्णपणे पडझड झालेली होती . या पोलीस वसाहतीत साधारणतः पाच चाळींमध्ये ४० ते ४५ पोलिसांची निवासस्थाने होती . पोलीस व त्यांच्या कुटुंबीयांना ये - जा गोकुळ कॉलनी ,सौ भागीरथीबाई तनपुरे शाळेसमोर एक खुश्किचा मार्ग देखील होता . दिवस-रात्र कायदा व सुव्यवस्थेसाठी राब राब राबणाऱ्या पोलीस दादांच्या घराचा मात्र प्रश्न मोठ्या कालखंडापासून जैसे थे प्रलंबित होता राहुरीत बदलून आलेले अनेक पोलीस कर्मचारी व अधिकारी यांना कुटुंबीयांसाठी बाहेर गावाहून ये जा करावी लागत होती.



छाया : राजेंद्र परदेशी

तसेच सर्व भाडोत्री रूम किंवा भाडोत्री फ्लॅट घेऊन राहावे लागते. अनेकांना आपल्या मुलांच्या शाळांचा देखील प्रश्न सोडविण्यावर भर द्यावा लागत होता. आतापर्यंत अनेक जिल्हा पोलीस प्रमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक यांनी शासनाकडे तसेच पोलीस विभागाचे पोलीस महासंचालक कार्यालयाकडे प्रस्ताव पाठविले होते . सदरचे प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत होते . मात्र आता पोलीस कर्मचारी वसाहतीचा प्रश्न मार्गी लागणार आहे. साधारणतः ९३५ स्केअर मीटर्स मध्ये बहुमजली अशी पोलीस कर्मचारी वसाहत लवकरच होणार आहे. नगरच्या ठेकेदार कंपनीला या इमारतीचा प्लॅन अर्थात आराखडा तयार करण्याचे काम देण्यात आले असून बुलढाणा ( मेहेकर ) येथील ठेकेदार कंपनीला इमारतीचे काम तयार करण्याचे कंत्राट दिल्याची माहिती स्थानिक दिली.इमारत कशी होणार व ती कधी पूर्ण होणार याबाबत अधिक तपशील मात्र समजू शकला नाही. परंतु या जीर्ण व पडझड झालेल्या पोलीस कर्मचारी वसाहतीचे पाडापाडीचे काम नुकतेच सुरू करण्यात आले आहे. या पोलीस कर्मचारी वसाहतीमध्ये काही पोलिसांचे कुटुंबीय राहत होते. मात्र त्यांनी अन्यत्र स्थलांतर केल्याने पोलीस कर्मचारी वसाहतीचे बांधकाम पाडण्याचे काम सुरू झाल्याने आता राहुरी पोलिसांना नवीन पोलीस कर्मचारी वसाहत मिळण्याचा मार्ग मात्र मोकळा झाला आहे. सध्या या पाडापाडीच्या कामाची जोरदार चर्चा सुरू आहे.

# फुकटात आरोग्यदायी फायदे उचला

**रमजान मुबारक २०२५,**
**रोजा नं. १६ वा ,**

आज रमजान मुबारक अनिवार्य चा १५ वा रोजा. उन्हाळा चालू होण्याच्या काहीच दिवस अगोदर व आज तर उन्हामध्ये रोजे शारीरिक व मानसिक दृष्टीने खडतर परीक्षा घेत १५ पूर्णतवास जात आहेत , कुठेतरी माध्यन्य झाले म्हणून हायसे वाटत असणार, काही बांधूनी विचार केला असेल कीं आपण विविध अगदी पोकळ होऊन गेलेलो आहेत आपल्याच्यान होणार का नाहीं? लोकांचं विविध प्रश्न - समस्या पण शेवटी तर अनिवार्य!! करणे ही करणं आहेत. काहीं काही बांधूनी चंद्र कोर बघून च स्वतः बरोबर मित्रांचे, बायकोच ुशळसहीं वजन बघतील असतील - काहींनी आपली शारीरिक चाचणी, शुगर रेकॉर्ड, ब्लड प्रेशर तपासून, थायरॉईड रिपोर्ट, असतील, आज बाजारात वजन कमी करण्यासाठी विविध नाना प्रकारच्या जाहिराती, विविध मल्टिनेशन कंपनीचे वजन ुशळसहीं ॲशर्वीलळपस कमी करण्याचं आमिष दाखवणारे व १००%गॅरंटीड प्रॉडक्ट, सांगतांना हमखास वजन कमी करण्याची हमी. हो हमी नंतर त्यातूनच आपलं व्यवहार इस्पित सध्य करणारे हुशार बुद्धी मान व्यवसायिक व तीन मेंबर्स च्या चैन सिस्टिम च्या स्किम्स... यातून काय साध्य होतं.. माझ्या सह अनेकानेक लोकांना पडलेलं एक कोडं.. हो कोडं च..परंतु उत्तम उत्तर तर, रमजान महिनातील रोजे अगदी प्रामाणिक पने केलं तर, ज्यांना ज्यांना वजन कमी करण्याची ओढ लागलेली आहेत किंवा हशरश्रींहू हेल्दी लेपीलळीीं लोकं, किंवा गले लठ्ठ माणसांनी पंधराह दिवसात थोडया फार फरकाने कमी ३ किलो वजन कमी झालं असेलच, फार चांगलीच बाब म्हणावी लागेल. दिवसभर शारीराला पुरेल व उत्साह वाटेल इतकं संतुलित आहार घेणं गरजेचं असतं. आजचा जमाना फास्टफूड चा, इन्स्टंट सह चविष्ट खाण्याचा, परंतु त्याचं नुकसान तर कायिक पटीनें, त्यामध्ये फॅट्स, चरबी अति प्रमाण, स्वादिष्ट मिठाचं जास्त प्रमाण, त्यात पुन्हा पद्धती वेगळ्याच,त्यामध्ये सिनथेंटीक केमिकॅल चे प्रमाण ही जास्त, काही म्हणतात कीं चवी साठी घातलेल



रोजा नंबर
लेखक :- डॉ. सलीम साईदा सिकंदर शेख
बैतुशशिफा दवाखाना ९२७१६४००१५

डुकराच्या चरबी व हाडानी बनवलेले अगदी आरोग्यासाठी घातक अझीनो मोटो, म्हणून त्याचा परिणाम अर्थात आपल्याच शरीरावर हृदय रोग, मधुमेह (डायबेटिस,) पुन्हा वजन वाढ्त, वजन वाढल्या मुळे गुढग्यावर दवाब येऊन संधिवातचा त्रास, कमरेचा त्रास व मनके, त्रास, वजन वाढलं मुळे पुन्हा मधुमेह आलाच ब्लड प्रेशर आलं,अशा बऱ्याच आजरांना स्वतः हुन आमंत्रण निमंत्रण देण्याच.सध्याच्या काळातीलइंटरनेट जमाना, ख आय ढ टी सेक्टर मधील करियर करणाऱ्या खढ इंजिनीरचं राहणीमान हें १४ तास कॉम्प्युटर समोर सतत काम चालू असतं -सतत मिटींगा सतत, कोणी बॉस तुकडून वारंवार मीटिंग साठी करतोय, काहीतरी नवीनच खूळपत काढून काहींना काही प्रॉब्लेमस उकरून काढतोय, असे अनेक प्रॉबलेम, काही जण ुॲज्ञ षॲा केश घरात राहून काम करतात,घरामध्ये काम करणाऱ्या खढ इंजिनीर घरी असून देखील पारखे असतात, आपल्या घरातील एका बंदिस्त खोलीत आडवं -तिडवं -खुर्चीवर काम करतात,त्यांना सतत काहींना काही इन्स्टंट चटपटीत खायची सवय असते, त्यांची गरज ही असतं नाईलाज असतो म्हणून ते जरा जास्तच फास्टफूड खातात..त्यामुळे बहुतेक खढ इंजिनीर हें आपल्या कामाच्या व्यस्तते मुळे जास्तच लठ्ठ झालेले असतात कारण फास्टफूड व शारीरिक हालचाल ही होतं च नाहीं. म्हणून त्यांचा पोटाचे घेर जास्तच वाढलेला असतोस, विविध आजार होण्याचे प्रमाण जास्तअसतात.अशा काम करणाऱ्या मित्र कायमच आपल्या खाण्या पिण्याच्या सवयी आरोग्य दायी ठेवणं गरजेचं असतं. रोजीदरांनी फास्टफूड खाण्याचे प्रमाण कमीत कमीच ठेवलं तर उत्तम आरोग्य राहील, उत्तम आरोग्यासाठी नैसर्गिक अन्न जस फळ,टरबूज, काकडी, खरबूज, केळी, पेरू पपई, द्राक्षे, नारळ पाणी लिंबू पाणी सरबत, कड धन्य, शिजवलेलं पदार्थ, कमी मिठाचं प्रमाण अर्थात तुम्हाला उत्साही वाटेल संतुलित, पोषक तत्वाणी युक्त आहार जे नं करून दिवस भर तुम्हाला दिवस भर उत्साही व थकवा जाणवणार नाहीं व पच न संस्था चांगलीच राहिली पाहिजेत नाहीतर पोट दुःखी, ऍसिडिटी, दिवस भर ढेकर देत बसतात काही काही, तुमच्या किडनी वर, पोटावर, हृदयावर जादा लोड येणार नाहीत.

# निरोगी आरोग्यासाठी आ. काळे सतत प्रयत्नशील : चैताली काळे

**शिर्डी :** समाजातील प्रत्येक घटकाचे आरोग्य निरोगी राहावे यासाठी कोपरगावचे आमदार आशुतोष काळे प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन जिल्हा बँकेच्या मा. संचालिका चैताली काळे यांनी केले.

राहाता तालुक्यातील शिंगवे येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत साईबाबा संस्थान व साईबाबा रुग्णालय, महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत सर्व रोग निदान महाआरोग्य शिबिर व खगोल शास्त्रीय प्रयोगशाळेचे उदघाटन काळे यांच्या करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.याप्रसंगी डॉ. संदिप देवरे, डॉ. मुकुंद चौधरी, डॉ. संजय खुराणा, डॉ. अजिंक्य पानगव्हाणे, डॉ. पूजा सिंग, डॉ. अनंत भांगे, डॉ. अजित पाटील, माजी उपसरपंच ज्ञानदेव चौधरी, बाळासाहेब बाभुळके, ग्रामसेवक मच्छिंद्रनाथ कटारनवरे, ग्रामपंचायत सदस्य राजाराम काळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रमोद चौधरी, मुख्याध्यापक कर्पे, आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. काळे म्हणाल्या की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोफत उपचार मिळावा म्हणून महाशिबीर आयोजित करण्यात आले आहे. त्यमुळे पुढील काळात ते निरोगी राहतील. डॉक्टर नेहमी रुग्णांची सेवा करतात. रुग्ण सेवा हिच ईश्वर सेवा आहे.

द·ख·ल

## पीएमश्री गोंडेगाव शाळेत पक्षीमित्र उपक्रम



**गोंडेगाव** : येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत इको क्लब अंतर्गत पक्षीमित्र उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली आहे. श्रीरामपूर येथील पक्षीमित्र दिनेश चोरडिया यांच्या संकल्पनेनुसार पक्ष्यांची तहान भागवण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांना मातीची भांडी वाटप करण्यात आली. या उपक्रमासाठी श्रीरामपूर येथील उद्योजक अनिल चोरडिया यांनी अर्थसहाय्य केले. गेली नऊ वर्षापासून दिनेश चोरडिया हा उपक्रम राबवत आहे. त्यांनी पीएम श्री शाळेतील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येनुसार भांडी वाटप करण्याचा निर्णय घेतला. विद्यार्थ्यांनी त्यांची मुलाखत घेतली तेव्हा त्यांनी सांगितले की, माझे वडील माझ्या या कार्याची प्रेरणा आहेत. माझे वडील गाईसाठी पाणी ठेवत असत. आम्ही लहान भावंडदेखील ही गोष्ट पाहून अनुकरण करायचो. त्यांची आठवण म्हणून मी आता पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी सहाय्य करण्याचा पण केला आहे. पक्ष्यांची सेवा केल्यामुळे त्यांचे आशीर्वाद आपल्याला आपोआप मिळतात. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृंद आणि सर्व विद्यार्थ्यांनी पक्षीमित्र बनण्याचा संकल्प केला.

## 'छावा' पाहून गावकऱ्यांचे अश्रू अनावर

**खंडाळा** : सध्या सगळीकडे छावा या चित्रपटाची चर्चा आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या आयुष्यावरील हा चित्रपट सर्वांनाच भूरळ घालत आहे. छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा आणि त्यांनी दिलेले बलिदान हे मोठ्या पडद्यावर दाखवण्यात आले आहे. छावा चित्रपट पाहताना प्रत्येकाचा ऊर अभिमानाने भरुन येतो आणि डोळ्यात अश्रूंच्या धारा वाहतात.छावा चित्रपट पाहताना अनेकांना अश्रू अनावर होतात. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा बलिदान मास सर्वत्र सुरू आहे. यानिमित्ताने खंडाळा येथे छावा चित्रपट मोठ्या स्क्रीनवर दाखवण्यात आला. यावेळी बालगोपालंबरोबर थोरा-मोठ्यांनी धर्मवीर संभाजी महाराजांची शौर्यगाथा व त्यांनी दिलेले बलिदान हे सर्वांना अनुभवायला मिळाले. यावेळी चित्रपट बघत असताना प्रत्येकाला अश्रू अनावर झाले. चित्रपटाचे आयोजन मा. नगरसेवक रवी पाटील, योगेश जाधव व गणेश भिसे यांच्यावतीने तर श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानच्या सहकार्याने करण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

## देवळाली नगरपरिषदेच्यावतीने २० मार्चपासून व्याख्यानमाला

**राहुरी** : देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या श्री त्रिंबकराज मोफत वाचनालयाच्यावतीने २० ते २२ मार्च या कालावधीत समर्थ बाबुराव पाटील महाराज सांस्कृतिक भवन येथे तीन दिवशीय त्रिंबकराज व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असून, त्याचे उदघाटन शिर्डी संस्थानचे उपाध्यक्ष, माजी आमदार चंद्रशेखर कदम यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी विकास नवाळे यांनी दिली. २० मार्चला सायंकाळी ६ वाजता अहिल्यानगरचे साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांचे हसण्यासाठी जन्म आपुला, २१ ला कोल्हापूर येथील व्याख्याते युवराज पाटील यांचे जीवन सुंदर आहे, तर २२ मार्चला पुणे येथील साहित्यिक, व्याख्याते सचिन पवार यांचे संतांनी महाराष्ट्राला काय दिले या विषयावर व्याख्यान होणार आहे. समारोप श्रीरामपूरचे आ. हेमंत ओगले यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या व्याख्यानांचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरपरिषदेच्यावतीने करण्यात आले आहे.

## पोटचाऱ्यांचे रुंदीकरण करण्याची शेतकऱ्यांची मागणी



**पुणतांबा** : गोदावरी उजव्या कालव्याशी सलंग्न असलेल्या परिसरातील १७, १८ , १९ तसेच २० चाऱ्यांची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. सध्या १८ चारीचे नेहमीप्रमाणे काही ठिकाणी डागडुजी करण्याचे काम सुरु आहे. त्याऐवजी सर्वच चाऱ्यांचे रुंदीकरण व खोलीकरण करावे, अशी मागणी परिसरातील शेतकरीवर्गाने पाटबांधारे खात्याच्या राहाता येथील कार्यालयाकडे केली आहे. गोदावरी उजव्या कालव्याचे काम अंदाजे ११० वर्षापूर्वी झाले आहे. चाऱ्यांची कामेसुध्दा ७० -८० वर्षापूर्वी तात्कालिक परिस्थिती व गरजेनुसार झालेली आहे. गोदावरी उजव्या व डाव्या कालव्याच्या दुरुस्तीसाठी अंदाजे १७८ कोटी रुपयाचा निधी मंजूर झाल्याचे समजते. कालव्यांबरोबरच चाऱ्यांचे रुंदीकरण व खोलीकरण झाले तर त्यांची वहनक्षमता वाढेल. अनेक चाऱ्यांवर दुतर्फा छोटी-मोठी झाडी वाढलेली आहेत. अतिक्रमणे झालेली आहेत. अनेक ठिकाणी पाटबांधारे कालव्याच्या तसेच चाऱ्यांच्या जागेत झालेली अतिक्रमणे काढत आहे. राहाता पाटबांधारे खाते मात्र बघ्याची भूमिका का घेते याबाबत शेतकरीवर्गात साशंकता निर्माण झालेली आहे.

दरवर्षी उन्हाळयात चाऱ्यांची तात्पुरती डागडुजी करण्यापेक्षा कायमस्वरूपी चांगले काम करण्याची गरज आहे. सध्या १८ चारीचे डागडुजीचे काम पाहिल्यानंतर पाटबांधारे खाते नेमके काय करत आहे, असा प्रशन शेतकऱ्यांना पडला आहे.

## शिरसगाव ते श्रीक्षेत्र मढी पायी दिंडीस प्रारंभ

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव येथून सालाबादप्रमाणे श्रीक्षेत्र मढी येथे जाणाऱ्या पायी दिंडी सोहळ्याचे विधिवत पूजा करून नारळ फोडून शुभारंभ अध्यक्ष गणेशराव मुदगुले यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी उपसरपंच संजय यादव, दिलीप महाराज ताके, अशोकराव पवार, शिवाजीराव गवारे, बाळासाहेब बकाल, भास्करराव ताके, प्रभाकर ताके, रामदास ताके, बाळासाहेब गवारे, शुभम ताके, योगेश गवारे व सर्व कानिफनाथ भक्त मंडळ उपस्थित होते

# तुकोबारायांचे अभंग जगाच्या सुखासाठी आजही उपयुक्त : मंडलिक महाराज

## बीजोत्सव सोहळयाची काल्याच्या कीर्तनाने सांगता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : जगद्गुरू संत श्री तुकोबारायांच्या सदेह वैकुंठगमन बीजोत्सवाच्या निमित्तान येथील संत श्री तुकाराम महाराज मंदिरामध्ये आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सोहळयाची प्रमुख मार्गदर्शक महंत उद्धवज महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता करण्यात आली. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे अभंग जगाच्या सुखासाठी तर त्यांचे कार्य पुण्यधर्म वाढीसाठी होते, असे प्रतिपादन त्यांनी केले. उद्धव महाराज म्हणाले की, जी माणसे लवकर जबाबदारी घेतात, ती जीवनात चांगली कामे करू शकतात. राष्ट्राची व धर्माची सेवा करणे ही आपली जबाबदारी असून ही सेवा प्रत्येकाला घडली पाहिजे. कारण सेवा हे समाधान देऊन जाते आणि समाधानासारखी दुसरी श्रीमंती कोठेही नाही. ते समाधान परमार्थातून मिळत असते. संत तुकोबारायांचे जीवन चरित्र विषद करताना ते म्हणाले की, परमार्थ सेवेचा त्यांना मोठा अभिमान होता. त्यांचे अभंग हे जगाच्या सुखाकरता होते. ते असेच अभंग राहावेत अशी प्रार्थना त्यांनी केली. संत तुकाराम महाराजांचे कार्य पुण्य धर्म वाढीसाठी होते. आजचे जग हे निरीक्षण व चिंतन करणारे असल्याने शास्त्राला धरूनच त्यांनी समाजाला मार्गदर्शन केले असल्याचे त्यांनी सांगितले.



**नेवासा** : येथील संत तुकाराम महाराज मंदिरात बीजोत्सवाच्या निमित्ताने आयोजित काल्याच्या कीर्तनप्रसंगी दहीहंडी फोडताना गुरुवर्य उद्धवज महाराज मंडलिक. समवेत उपस्थित भाविक. **(छाया: सुधीर चव्हाण)**

तुकोबारायांच्या वैकुंठगमनाला ३७५ वर्षे झाले तरी त्यांच्या विचारांचे समर्थनच जगात होत असल्याचे त्यांनी सांगितले. सुखाची पहाट उगवण्यासाठी दुःखाचा सामना हा करावाच लागतो. काम आणि नामाची सांगड घालून सुखाचा अनुभव येण्यासाठी जीवनात देवाला आपलसं करा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी संत तुकाराम महाराजांच्या नामाचा जयघोष करत पुष्पवृष्टीद्वारे वैकुंठगमन बीजोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. बीजोत्सवाच्या निमित्ताने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात योगदान देणाऱ्या दात्यांचा तसेच हस्तलिखित गाथा ग्रंथ पूर्ण करणाऱ्या भाविकांचा यावेळी श्रीफळ प्रसाद देऊन गौरव करण्यात आला. यावेळी झालेल्या कीर्तनप्रसंगी विश्वनाथबाबा मंडलिक, अंकुश महाराज जगताप, सुनील महाराज पारे, महेंद्र महाराज शेजुळ, संतोष महाराज थोरात, पावन गणपती देवस्थानचे अध्यक्ष ॲड. सुखदेव वाखुरे, लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, बाळासाहेब धस, शंकरराव लोखंडे ,इंजिनीयर सुनीलराव वाघ, नारायण लोखंडे, ॲड. बापू गायके, नंदू गायके, डॉ. लक्ष्मण खंडाळे, राजेंद्र परदेशी, दशरथ मुंगसे, विष्णूपंत ठोसर, आण्णासाहेब माकोणे, वरद विनायक देवस्थान लोणी येथील कचरू निर्मळ, कृष्णा शिंदे, रखमाजी नाचन, रामकृष्ण कांगुणे, दिलीप जामदार यांच्यासह भाविक उपस्थित होते. भाविकांना सुभाष विखोना व परिवार, सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक संजय पाटील यांच्यावतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## तीर्थदर्शन योजनेबद्दल ज्येष्ठांकडून ना.विखे पाटील यांचा सत्कार




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : शासनातर्फे मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेमार्फत अहिल्यानगर जिल्हयातील ज्येष्ठ नागरिकांची पहिली तुकडी अहिल्यानगर रेल्वे स्टेशन येथून ९ मार्चला रवाना झाली व सर्व ज्येष्ठ नागरिक अयोध्या रामजन्मभूमी दर्शन घेऊन परतले. त्यासाठी पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे यांनीही विशेष प्रयत्न केले. ज्येष्ठ नागरिकांच्यावतीने महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे उपाध्यक्ष वसंतराव मुठे यांनी सर्वांच्यावतीने नामदार विखे यांचा सत्कार केला तसेच प्रशासकीय अधिकारी, जिल्हाधिकारी, सामाजिक न्याय विभाग, लोकप्रतिनिधी व सहकारी यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या या नियोजनामुळे राहण्याची, पिण्याचे पाणी, आसन व्यवस्था, वैद्यकीय सुविधा उत्तम प्रकारे दिल्याबद्दल श्री मुठे यांनी आभार मानले व तसे पत्र नामदार विखे यांना दिले.

## पिंपरी निर्मळमध्ये छावाला भरभरुन प्रतिसाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पिंपरी निर्मळ** : अखिल भारतीय मराठा महासंघ अहिल्यानगर, श्रीराम संघ आणि शिवजयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमावर आधारित ङ्गछावाफ चित्रपटाचे मोफत दाखण्यात आला. हरिहर अमृतेश्वर महादेव मंदिर परिसरात हा ऐतिहासिक चित्रपट मोठ्या पडद्यावर प्रदर्शित करण्यात आला. ग्रामस्थांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला. विशेषतः महिलांचा मोठा सहभाग हा उत्साहवर्धक ठरला. शिवभक्तांनी संभाजी महाराजांच्या धगधगत्या इतिहासाचे दर्शन घेत या चित्रपटाचा मनमुराद आनंद लुटला. उपस्थित प्रेक्षकांनी आणि ग्रामस्थांनी या उत्तम आयोजनाचे भरभरून कौतुक केले. शिवजयंती उत्सव समिती तसेच प्रकाश नर्मळ, मयूर घोरपडे, प्रशांत निर्मळ, आकाश घोरपडे, गणेश निर्मळ, सागर निर्मळ, दीपक घोरपडे, सागर मोरे, राजेंद्र निर्मळ, निखिल निर्मळ, अभिजीत निर्मळ यांनी यासाठी परिश्रम घेतले. या चित्रपटामुळे युवा पिढीला इतिहासाची जाणीव होईल, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## पंजोबांच्या प्रेरणेने पतवंडांनी केला रमजानचा उपवास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा येथे पंजोबाच्या प्रेरणेने चौथ्या पिढीतील सहा वर्षीय आराण व पाच वर्षाच्या फैजू या दोन पतवंड्यांनी देखील रमजानचा एक दिवसाचा उपवास केला आहे. नेवासा शहरातील फळांचे व्यापारी व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष जेष्ठ कार्यकर्ते गफूरभाई बागवान यांच्या शमीर व हारुण या नातवंडयांच्या आराण व फ़ैजू या दोन मुलांनी आपल्या पंजोबाच्या प्रेरणेने रमजानच्या पवित्र महिन्यातील एक दिवसाचे उपवास पूर्ण केले आहे. रमजानचे उपवास करणारा सहा वर्षीय आराण हारुण बागवान हा नेवासा खुर्द मराठी शाळेत इयत्ता पहिलीत तर पाच वर्षीय फैजू शमीर बागवान हा नेवासा येथील अंगणवाडीत शिक्षण घेत आहे. या दोन्ही ही रोजेदारांचे कुटुंबातील सदस्यांनी कौतुक करून सत्काराद्वारे अभिनंदन केले.



## तुकाबारायांचे वैकुंठ गमन म्हणजे देव-भक्त ऐक्य : शृंगारे

### २४ स्वच्छता कर्माच्याऱ्यांचा सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठ गमन म्हणजे देव-भक्त ऐक्य सोहळा असल्याचे प्रतिपादन भागवताचार्या स्नेहगंगा शृंगारे यांनी केले. संत तुकाराम बीजनिमित्ताने लोणी बुद्रुक ग्रामपंचायतीच्या २४ स्वच्छता कर्मचाऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. जगद्गुरू संत तुकाराम महाराज सेवा ट्रस्ट व ग्रामस्थ लोणी बुद्रुक यांच्या वतीने आयोजित केलेल्या तुकाराम बीजोत्सव सोहळ्यात रविवारी कीर्तन सेवा देताना शृंगारे म्हणाल्या की, जगाच्या पाठीवर संत तुकाराम महाराज यांच्यासारखी भक्ती कुणालाच करता आली नाही. म्हणून सदेह वैकुंठाला जाण्याचे भाग्य फक्त त्यांनाच मिळाले. कधी मेणाहून मऊ तर कधी वज्राहून कठीण होणारे तुकाराम महाराज त्यांच्या अभंगाच्या वह्या चंद्रभागेच्या डोहात बुडावल्यानंतर अनुष्ठानाला बसले. तेरा दिवस अनुष्ठान केल्यानंतर त्यांच्या वह्या जशाच्यातशा तरल्या. त्या भगवंताने तारल्या. त्या तरल्या म्हणून आपण तरलो. लोणीमध्ये संत तुकाराम महाराज यांचा बीजोत्सव गेल्या २५ वर्षांपासून अखंड सुरू आहे. जगातील सर्वात श्रेष्ठ संताची सेवा आपण करता. हा उत्सव भविष्यात अधिक व्यापक होईल आणि नव्या पिढीला योग्य मार्गदर्शनासाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कीर्तनानंतर लोणी बुद्रुक ग्रामपंचायतीच्या २४ स्वच्छता कर्मचाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. जेष्ठ नेते माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभास भारत महाराज धावणे, तंटामुक्तीचे अध्यक्ष संपतराव विखे, प्रवरा बँकेचे संचालक किसनराव विखे, ट्रक सोसायटीचे अध्यक्ष नंदकीशोर राठी, बाजार समितीचे संचालक राहुल धावणे, माजी सरपंच लक्ष्मण बनसोडे, वसंतराव विखे, दिलीपराव विखे, भाऊसाहेब धावणे, नाना म्हस्के, गणेश मैड, गणेश विखे, कुंडलिक म्हस्के, डॉ. प्रकाश म्हस्के, ट्रस्टचे अध्यक्ष देविदास म्हस्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रवरा डॉक्टर्स असोसीएशनच्यावतीने स्वच्छता कर्मचाऱ्यांना सेफ्टी किट देऊन त्यांचा सन्मान केला. उपस्थितांचे स्वागत अनिल विखे यांनी केले तर प्रास्ताविक दादासाहेब म्हस्के यांनी व आभार परशुराम विखे यांनी मानले. कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांना सुवर्णा विखे यांच्यावतीने भोजन प्रसाद देण्यात आला. उद्या (दि.१७) सप्ताहाच्या काल्याचे कीर्तन महंत उद्धव महाराज मंडलिक यांचे सकाळी १० वा होणार असून त्यानंतर पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील स्मृती संत सेवा पुरस्काराचे मान्यवरांच्या हस्ते वितरण होणार आहे. महाप्रसाद देऊन उत्सवाची सांगता होईल.




## शिंगवे तुकाईच्या ग्रामस्थांचे उपोषण सुटले

### आमदार विठ्ठलराव लंघे यांची यशस्वी मध्यस्थी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा फाटा** : शिंगवे तुकाई (ता. नेवासा) या गावाला वांबोरी चारी टप्पा दोनचे पाणी मिळण्यासाठी गेल्या सहा दिवसांपासून सुरु असलेले ग्रामस्थांचे उपोषण आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या यशस्वी मध्यस्थीनंतर मागे घेण्यात आले. शिंगवे तुकाई येतील ग्रामस्थ गेल्या दहा तारखेपासून गावाला पाटपाणी मिळावे या मागणीसाठी उपोषणाला बसले होते. यादरम्यान अनेक अधिकारी आले व त्यांन ग्रामस्थांना उपोषण सोडण्याची विनंती केली. मात्र ग्रामस्थ आपल्या भूमिकेवर ठाम असल्याने अखेर आमदार विठ्ठलराव लंघे यांनी या उपोषणाची दखल घेत गेल्या सहा दिवसांपासून सुरु असलेले उपोषण सोडविण्यासाठी मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील, नेवासा तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांनी रविवार (दि.१६) रोजी उपोषणकर्त्यांची भेट घेतली यावेळी आमदार लंघे यांनी यशस्वी मध्यस्थी करत शिंगवे तुकाई गावाला पाटपाणी मिळण्यासाठी आपण राज्य सरकारकडे मागणी करणार आहोत आपल्या गावावर अन्याय होणार नाही यासाठी आपण विशेष लक्ष घालणार असल्याचे आश्वासन आमदार लंघे यांनी दिल्यामुळे सहा दिवसांपासून सुरु असलेले हे उपोषण अखेर आमदार लंघे तसेच भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरड यांच्या यशस्वी मध्यस्थीनंतर सोडण्यात आले.



**नेवासा फाटा** : तुकाई शिंगवे (ता.नेवासा) येथे वांबोरी चारी टप्पा दोनचे पाणी मिळण्यासाठी गेल्या सहा दिवसांपासून सुरू असलेले उपोषण सोडवताना आमदार विठ्ठलराव लंघे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा आदी. **(छाया : सोपान भगत)**

तुकाई शिंगवे हे गाव पाटपाण्यापासून अनेक दिवसापासून वंचित आहे. या गावचा हा प्रश्न मागील काळात सुटायला पाहिजे होता. परंतु तो सुटला नाही. मात्र आता जिल्ह्याचे पालकमंत्रीराधाकृष्ण विखे यांच्याकडे जलसंपदा खात असल्याने विखे यांच्याकडे प्रामुख्याने या विषयासाठी आग्रह धरणार आहे.
**- आमदार विठ्ठलराव लंघे**

## शिवाजी महाराजांच्या विचारांचे प्रतिबिंब कृतीतून दिसावेः मंत्री विखे

### नांदुर्खी येथील दगडी प्रवेशद्वाराचे उदघाटन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा मोठा वारसा देशाला मिळाला आहे. आपल्याकडे असलेले गड किल्ले ही इतिहासाची प्रतिके आहेत. गड किल्ल्याच्या संवर्धनाचा मोठा कार्यक्रम महायुती सरकारने हाती घेतला असून शिवाजी महाराजांच्या विचारांचे प्रतिबिंब कृतीतून दिसले पाहिजे असे प्रतिपादन जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले. नांदुर्खी बुद्रूक येथे लोकसहभागातून उभारलेल्या दगडी प्रवेशद्वाराचे उदघाटन काशिकानंद महाराज यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यानिमित्ताने मंत्री विखे यांचा नागरी सत्कार ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आला. जेष्ठ विचारवंत प्रा. एस. झेड देशमुख, सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, कैलास कोते, गोपीनाथ, गोंदकर सोन्याबापू चौधरी, राजेंद्र चौधरी, सरपंच मावधराव चौधरी, उपसरपंच सचिन कोळगे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. मंत्री विखे म्हणाले की, लोकसहभागातून ग्रामस्थांनी उभारलेल्या प्रवेशद्वारामुळे गावाला गावपण आले आहे. पूर्वीच्या काळी गावात असलेली वेस ही इतिहासाची साक्ष असल्याचे सांगून छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्व वाटचालीत इतिहासाचे असे दाखले मिळतात. महाराजांच्या विचारांचा समृध्द वारसा आपल्याला लाभला असल्याचे स्पष्ट करून शिवाजी महाराजांच्या इतिहासाची पारायणे गावोगावी झाली पाहिजेत आशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आपल्याकडे असलेले गड किल्ले इतिहासाची प्रतिके आहेत. त्यांची जपवणूक करणे, पावित्र्य राखण्याची जबाबदारी आपल्या सर्वाची आहे. महायुती सरकारने गड किल्ल्याचे संवर्धन करण्याचा मोठा निर्णय घेऊन महाराजांच्या इतिहास अधिक समृध्द करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मंत्री विखे म्हणाले. आपल्या जिल्ह्याचे भूषण पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे राष्ट्रीय स्मारक उभारले जाणार असून स्टॅच्यु ऑफ युनिटीच्या धर्तीवर उभारले जाणारे हे स्मारक महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारे ठरेल. श्रीक्षैत्र नेवासा येथे संत ज्ञानेश्वर सृष्टी उभारून या जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र विकासला प्राधान्य देण्याचे काम होणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिर्डी औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार आहे. उद्योजक गणेश निबे यांच्यानंतर आता टाटा गृपचे कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू होत असल्याने आपल्या भागातील युवकांना प्रशिक्षणाची मोठी संधी मिळेल. शिर्डी विमानतळाच्या इमारतीच्या कामासाठी १ हजार ३०० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. पाण्याचे प्रादेशिक वाद कायमस्वरूपी मिटविण्यासाठी गोदावरी लाभक्षेत्रात अतिरिक्त पाणी आणण्याचे काम करावे लागले आहे. नदीजोड प्रकल्प ही मोठी उपलब्धी असून यासाठी कितीही निधी लागला तरी तो उभारण्याचे नियोजन करणार असल्याचे सांगून महाराष्ट्र पाणी परिषदेच्या माध्यमातून स्व.गणपतराव देशमुख आणि खासदार साहेबांनी केलेल्या कामाचे स्वप्न पूर्ण करणार असल्याची ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली.



## युवा प्रशिक्षण योजनेतील युवकांना भविष्याची चिंता

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : राज्य सरकारने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थींना पाच महिन्याची मुदतवाढ दिली आहे. याविषयी शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी सहा महिन्यांसाठी प्रशिक्षणार्थींची नेमणूक करण्यात आली होती. मात्र आता शासकीय नोकरीत १० टक्के आरक्षण व कायमस्वरूपी रोजगार द्यावा अशी मागणी योजनेतील उमेदवारांकडून करण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी तात्कालीन (महायुती) सरकारने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणाची योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत युवक-युवतींना दहा हजार रुपये मानधन देऊन विविध शासकीय आणि खासगी आस्थापनांवर रोजगार उपलब्ध करून दिला होता. सहा महिन्याचा कालावधी संपत असल्यामुळे शासनाने १० मार्च रोजी योजनेस पाच महिन्यांची मुदतवाढ देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. यामुळे पुढील पाच महिने युवा प्रशिक्षण योजना सुरू ठेवण्यात आल्याचे दिसून येत आहे. नगर जिल्ह्यात सुमारे दहा हजाराहून अधिक युवक-युवती या योजनेत सहभागी झालेले आहेत. त्यांना विविध शासकीय, नियमशासकीय तसेच खाजगी आस्थापनावर प्रशिक्षणार्थी उमेदवार म्हणून नेमणूक देण्यात आलेली आहे आहे. भाजप सरकारने युवा प्रशिक्षण योजनेस पाच महिन्याची मुदत वाढ दिली असली तरी हा कालावधी संपल्यानंतर पुढे काय ? फक्त प्रमाणपत्र का? याचा उपयोग कुठे याची दिशा सरकारने कायमस्वरूपी स्पष्ट करावी व आम्हाला ठोस निर्णय सांगितलेला नाही. महायुती सरकारने सरकारी नोकरीत दहा टक्के आरक्षण, आणि कायमस्वरूपी बेरोजगाराचा प्रश्न सोडवावा तसेच सध्या कार्यरत असलेले युवक-युवती ट्रेनी म्हणून १०० टक्के कामकाजात यशस्वी असून कमी वेतनामध्ये हे सुशिक्षित बेरोजगार काम करून शासनाचा पैसा वाचवत आहेत. त्यामुळे आम्हाला कायमस्वरूपी नोकरीत घ्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# बचत गटाच्या पैश्यातून खाजगी एजन्सीने कोणाच्या परवानगीने घेतल्या शिलाई मशीन ?

**दादा सोनवणे | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील बचत गटाच्या माध्यमातून अनेक गोरगरीब महिलांना गंडा घालण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात झाले असून यामध्ये रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून सीएसएफ फंडातून आलेल्या रकमेतून शिलाई मशीन कोणाच्या परवानगीने घेतला याचे उत्तर मात्र ग्रामसंग प्रभाग संघ अथवा महिला समन्वयक हे कोणीही देऊ शकत नसल्यामुळे हा घोटाळा नेमका कोणाच्या आशीर्वादाने झाला आहे ,हे मात्र चित्र अजूनही गुलदस्त्यातच आहे. महिला सक्षमीकरणासाठी राज्य तसेच केंद्र सरकारच्या विविध योजना आहेत. या योजनेच्या नावाखाली गैरफायदा घेत महिलांची मोठ्या प्रमाणात फसवणूक केली जात असल्याचे धक्कादायक प्रकरण श्रीगोंदयात उघडकीस आले आहे. महिला बचत गटाच्या नावाखाली चक्क एक खाजगी एजन्सी व्यवसाय करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे ,तर यातून मिळणाऱ्या नफ्याचे कोण मालक होते हे पण यातील महिलांना माहीत नाही तर दोन तीन महिलांनी एक संस्था धर्मादाय यांच्याकडे नोंदणी करून रिजर्व बँकेच्या कोणत्याही प्रकारच्या परवानग्या नसताना चक्क सावकारकी करत असल्याची तक्रार सहाय्यक निबंधक कार्यालयात काही दिवसांपूर्वी दाखल झाली होती. त्यावर पोलीस ठाण्यात देखील अर्ज करण्यात येऊन चौकशी सुरू आहे याच दरम्यान दैनिक राष्ट्र सह्याद्री मधून बचत गटाच्या घोटाळ्याप्रकरणी मोठ्या प्रमाणात प्रकाश आल्यावर महिलांच्या कडून झालेल्या चुका त्यांच्या लक्षात येऊ लागल्या असून बचत गटाच्या महिलांची ग्रामसंघ प्रभागसंघ यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात वादावादी होऊ लागल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे. बचत गटाच्या खात्यातून अध्यक्ष आणि सचिव यांच्या सहीने विविध बँकांचे धनादेश ग्रामसंघ प्रभाग संघातील महिलांनी गोळा करून ते एका खाजगी एजन्सीच्या खात्यात वटवले आहेत काही अज्ञात व्यक्तीच्या नावे धनादेश वटविण्यात आले आहेत. आता या घोटाळ्याची चौकशी झाली असून त्याचा अहवाल जिल्हा परिषद मध्ये जमा करण्यात आलेला आहे त्यावर लवकरच योग्य ती कारवाई होणारच आहे. मात्र जर कारवाई झाली तर ती बचत गटांच्या अध्यक्षा सचिव यांच्यासह सर्व सामान्य महिलांवर होणार कारण यांच्या गटातील अथवा प्रभागसंघातील महिलांनी हाताने गटाच्या खात्यातून धनादेश दिले आहेत, त्याचा कुठेही हिशोब नसल्याने गटाच्या अध्यक्षतेखाली ते धनादेश कश्याच्या आधारावर दिले गेले आणि त्यातून जिल्हा परिषद पंचायत समिती यांचा कुठलाही आदेश नसताना त्यामधून शिलाई मशीन कोणाच्या आदेशाने कोणासाठी विकत घेतल्या असा प्रश्न उपस्थित होत आहे. यामध्ये पंचायत समिती जिल्हा परिषदेचे अधिकारी ? बचत गटाच्या घोटाळ्यामध्ये एकट्या महिला एवढे मोठे पाऊल उचलू शकत नाही किंवा एवढा घोटाळा करू शकत नाही त्यामुळे बचत गटाच्या लाखोंच्या घोटाळ्यामध्ये पंचायत समितीसह जिल्हा परिषदेचे अधिकारी सामील असण्याची शक्यता नाकारता येत नाही असे सर्वसामान्य महिलांमधून बोलले जात आहे.

### घोटाळा उघड केल्याने महिला खुश

श्रीगोंदा तालुक्यातील सीआयएफ च्या पैश्यातून मोठया प्रमाणात घोटाळा घालून गोरगरीब महिलांचे संसार उघड्यावर पडणाऱ्या महिलांचे कारनामे जनतेच्या समोर आल्याने अनेक महिला खुष आहेत.आता मराठी गाण्याप्रमाणे सोनुवर भरवसा राहिला नाही मात्र तरीही त्या आमच्यावर विश्वास ठेवा असे अनेकांना फोन मसेज करत आहेत मात्र त्यांचेवर कोणीही विश्वास ठेवण्यास तयार नसल्याने चांगलीच दमछाक झाली आहे.

द•ख•ल

## सावकारी व्यवहारात लिहून दिलेले दस्त अवैध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर:**सावकारी व्यवहारात लिहून दिलेले दस्त महाराष्ट्र सावकारी ( नियमन ) अधिनियम २०१४ चे कलम १८ (२) नुसार अवैध असल्याचे घोषित करण्यात आले आहे. याबाबतचे आदेश जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अहिल्यानगर गणेश पुरी यांनी दिले आहेत. याबाबत सविस्तर असे की, अभय ललवाणी यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे सावकारी व्यवहारात लिहून दिलेले दस्त रद्द होणेबाबत ०९ फेब्रुवारी २०२१ रोजी तक्रार अर्ज दिला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ तील तरतुदीनुसार व्यवहारा ची सखोल चौकशी करण्यात आली. अर्जदार यांचे वडील रामलाल देवीचंद ललवाणी व शिवशंकर शांतीलाल भंडारी २००५ साली झालेला व्यवहार हा अवैध सावकारीतून झाला असल्याचे सखोल चौकशीअंती निष्पन्न झाले. कायद्यातील तरतुदीनुसार विनापरवाना सावकारी केल्यामुळे शिवशंकर शांतीलाल भंडारी याचेवर सावकारी कायद्यातील कलम ३९ नुसार यापूर्वीच गुन्हा दाखल झालेला आहे. प्रकरणाची पुढील सुनावणी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अहिल्यानगर यांचे समोर नुकतीच पूर्ण झाली. अर्जदार अभय रामलाल ललवाणी तक्रार अर्जातील मुद्द्यांमध्ये तथ्य आढळून आले व त्यानुसार सदर व्यवहार बेकायदेशीर सावकारीतून झाल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे रामलाल देवीचंद ललवाणी यांनी प्लॉट नं. ११, संजीवनी कॉलनी, मल्हार चौक, स्टेशन रोड, मौजे नालेगाव, स. नं. ४८ अ १ / ४८ ब, ता. जि. अहिल्यानगर या मालमत्तेचे शिवशंकर शांतीलाल भंडारी यांना लिहून दस्त क्र. ३३५५ / २००५ दि. : ३०/११/२००५ व दस्त क्र. ३४४९ / २००५ दि. : ०८/१२/२००५ हे अवैध असल्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर गणेश पुरी यांनी घोषित केले व दस्तातील नमुद मिळकत ही अर्जदार यांच्याकडे परत करण्याचे आदेश पारित केले आहेत.

## श्री स्वामी नरेंद्रचार्य महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** जगद्गुरु श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा रविवार दि.१६ मार्च रोजी जामखेड शहरात मोठ्या उत्साह वातावरणात संपन्न झाला. तरी या महन्मंगल समयी तालुक्यातील सर्व भाविकांनी सहकुटुंब सहपरीवार कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित राहुन पादुकांच्या दर्शनाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी दहा वाजता जगद्गुरुश्रींच्या सिद्ध



पादुकांची जामखेड शहरातून भव्य मिरवणूक नंतर पादुका कार्यक्रमाच्या संत पिठावर विराजमान करण्यात आल्या यानंतर गुरुपूजन , आरती , प्रवचन, उपासक दीक्षा, दर्शन व पुष्पवृष्टी इत्यादी कार्यक्रम मोठ्या उत्साही वातावरणामध्ये भाविकांच्या जल्लोषात पार पडला.जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने नेहमी लोकपयोगी ामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये जामखेडच्या कार्यक्रमांमध्ये टॉयलेट व्हॅन भेट देण्यात आले. ावेळी मान्यवरांच्या चावी देऊन त्याचे अनावरण करण्यात आले यावेळी आष्टी, पाटोदा, शिरूर चे आमदार सुरेश धस, बाजार समितीचे सभापती शरद कार्ले, माजी सभापती भगवान मुरूमकर, नगरसेवक अमित चिंतामणी, नगरसेवक पवन राळेभात, बाजीराव गोपाळघरे, केदार रसाळ, लक्ष्मण ढेपे, राहुल बेदमुथा उपस्थित होते.या वेळी गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण शैक्षणिक साहित्य वाटप, संस्थांनच्या वतीने ॲम्बुलन्स महाराष्ट्रभर मोफत सेवा आणि श्री क्षेत्र नाणीजधाम येथे २४ तास हॉस्पिटल सेवा सुरू आहे. गोर-गरीब शेतकऱ्यांना मोफत बियाणे खते, औषधे, शेती अवजारे वाटप केली जातात, दुष्काळ पडल्यास संस्थांनच्यावतीने जनावरांना शेकडो टन चारा पूरविला जातो. अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता अध्यात्म विज्ञान व्यवहार यांची सांगड घालून जीवन कसे जगावे याचे केले जाते. निराधार महिलांना शिलाई मशीन, शेळ्या-मेंढ्या दूभत्या गाई म्हशीचे वाटप केले जाते. अशा प्रकारे अनेक उपक्रम राबविले जातात. कार्यक्रमात येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते.

## राष्ट्रवादी महिला पक्षाची जिल्हा कार्यकारणी जाहीर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महिलांची कार्यकारणी जाहीर करण्यात आली यामध्ये आशाताई निंबाळकर जिल्हाध्यक्ष, सुजाता कदम उपजिल्हाध्यक्ष, स्मिता वाल्हेकर उपजिल्हाध्यक्ष, संगीता ससे उपजिल्हाध्यक्ष, वनिता ठोंबे सरचिटणीस, स्वाती पवार सरचिटणीस, रूपाली तांबोळी सरचिटणीस, कल्याणी गाडळकर जिल्हा सरचिटणीस, अंबिका भिसे जिल्हा सरचिटणीस, अश्विनी दळवी कोषाध्यक्ष, अश्विनी झरेकर स्नेहल दरंदले उप तालुकाअध्यक्ष, टीना लालबेग उप तालुकाअध्यक्ष, दिपाली आढाव सहसचिव, भारती दिवटे सहसचिव आदी महिलांची निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार थेट शेवटच्या घटकापर्यंत घेऊन जाण्याचे काम जिल्हा महिला आघाडी नक्कीच करेल. जिल्ह्यातील युवती-महिलांच्या व्यथा समजावून घेत सोडवण्याचे काम देखील केले जाईल. महिलांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे महिला जिल्हाध्यक्षा आशाताई निंबाळकर ह्या नक्कीच करतील. राज्याचे उपमुख्यमंत्री व पक्षाच्या अध्यक्ष अजित पवार हे शासनाच्या माध्यमातून विविध योजना यशस्वीपणे राबवीत असून त्या योजना महिलांपर्यंत घेऊन जाण्याचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे. दैनंदिन जीवनामध्ये महिलांना येणाऱ्या अडचणी प्राधान्य क्रमाने सोडविल्या जाण्याचे काम महिला आघाडी करेल. पदावर काम करत त्या पदाला न्याय देण्याचे काम पदाधिकाऱ्यांनी केले पाहिजे, समाजामध्ये वावरत असताना समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो त्या भावनेतून सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जोपासत आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. आपण राहत असलेल्या भागातील प्रश्न समजावून घेत ते सोडवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला पाहिजे, आपण जर यशस्वीपणे काम केल्यास नागरिकही मोठ्या विश्वासाने काम घेऊन येत असतात. त्या माध्यमातून आपल्याला प्रतिष्ठा मिळत असते असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर राष्ट्रवादी महिला काँग्रेस पक्षाची जिल्हा कार्यकारणी नियुक्तीपत्राचे वाटप आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष आशाताई निंबाळकर, शहर अध्यक्ष रेश्माताई आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

> शिवसेना पक्षामध्ये आम्ही सर्व महिलांनी अनेक वर्ष काम केले होते आमदार संग्राम जगताप यांच्या विकासाच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला, आणि आज मला जिल्हाध्यक्ष पदावर काम करण्याची संधी दिली. त्या माध्यमातून जिल्ह्यातील महिलांना संघटित करीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार घेऊन जाण्याचे काम केले जाईल, माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवला जाईल असे मत जिल्हाध्यक्ष आशाताई निंबाळकर यांनी व्यक्त केले.



## आनंदऋषीजी'चे कार्डियाक सेंटर सर्वसामान्य जनतेचे हृदय बनले : प्रेमराज बोथरा

### आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २६० रुग्णांची मोफत हृदय तपासणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** - आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचे हृदय बनले आहे. महाराष्ट्रासह देशातील कानाकोपऱ्यातून हृदयासंबंधी असलेल्या विविध शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्ण येत आहेत. २००४ मध्ये सेवाभावाने झालेल्या या सेवेने सर्वसामान्यांच्या हृदयात घर करुन मोठा विश्वास संपादन केला आहे. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत हृदयासंबंधी सर्व शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या असून, आनंदऋषीजी हॉस्पिटलचे कार्डियाक सेंटर सोशल हब म्हणून उदयास आले असल्याची भावना प्रेमराज बोथरा यांनी व्यक्त केली. राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या ३३ व्या स्मृतिदिनानिमित्त सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल मध्ये स्व. जतनबाई मानकचंदजी बोथरा यांच्या स्मरणार्थ बोथरा परिवार व पारस ग्रुपच्या वतीने आयोजित मोफत हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी प्रेमराज बोथरा बोलत होते. बोथरा परिवारातील सदस्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी संतोष बोथरा, सतीश बोथरा, मनिषा बोथरा, संगिता बोथरा, प्रतिभा बोथरा, रुनवाल (विजापूर कर्नाटक), सीए आयपी अजय मुथा, सतीश लोढा, डॉ. आशिष भंडारी, अनिल मेहेर, डॉ. अमित थोपटे, डॉ. अनिकेत कटारिया, डॉ. गिरी, डॉ. गवळी, डॉ. पारधे आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात



सीए आयपी अजय मुथा म्हणाले की, बोथरा परिवाराने उद्योग व सामाजिक क्षेत्रात नाव उंचावले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या निर्मितीपासून ते महावीर युनिव्हर्सिटी उभारण्यासाठी या परिवाराचे महत्त्वाचे योगदान मिळत आहे. हॉस्पिटलच्या प्रगतीच्या विविध टप्प्यांवर या परिवाराने भक्कमपणे योगदान दिले आहे. सतीश बोथरा यांनी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या आरोग्य सेवेसाठी सर्व तन, मन, धनाने योगदान देत आहे. येणाऱ्या रुग्णांकडे माणुसकीच्या भावनेने पाहून त्याच्या जीवनातील वेदना दूर करण्याचे काम हे आरोग्य मंदिर करत आहे. आरोग्यसेवा रुग्णांना आधार देणारी ठरत असून, ही सेवा महाराष्ट्राची शान बनली असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. अनिकेत कटारिया म्हणाले की, हॉस्पिटलमध्ये अद्याप पर्यंत २५ हजारपेक्षा जास्त बायपास सर्जरी, ५० हजारपेक्षा अधिक एन्जोप्लास्टी व १ लाखापेक्षा अधिक अँजिओग्राफी करण्यात आलेली आहे. तसेच २ हजार लहान बालकांच्या हृद्यरोग संबंधी यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आहेत. बायपास सर्जरी ही अत्यंत अवघड शस्त्रक्रिया यशस्वी केल्या जात आहे. महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत या शस्त्रक्रिया मोफत होत असल्या तरी त्याचा दर्जा सर्वोत्तम ठेवण्याचे काम तज्ञ डॉक्टर करत असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरात २६० रुग्णांची मोफत हृदय तपासणी करण्यात आली. तर शिबिरात सहभागी गरजूंची ३ हजार अँजिओग्राफी करण्यात आली. गरजेनुसार रुग्णांची बायपास सर्जरी, हृदयातील झडप बदलणे, हृदयातील छिद्र बुजविणे, लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी अल्पदरात केल्या जाणार आहेत. तर महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत या शस्त्रक्रिया मोफत होणार आहेत. पाहुण्यांचे स्वागत डॉ. आशिष भंडारी यांनी केले. अनिल मेहेर यांनी आभार मानले.

## युवा साहित्यिक स्वप्निल खामकर यांची लंडनमधील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर** - शहरातील युवा साहित्यिक स्वप्निल संजय खामकर यांची लंडनमधील ग्रेस इन येथे २४ २५ एप्रिल रोजी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी निवड झाली आहे. ही प्रतिष्ठित परिषद महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, मुंबई विद्यापीठ आणि ग्रेस इन, यूके यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जाते.

या परिषदेत डॉ. आंबेडकर यांच्या कायद्याशी संबंधित योगदान, सामाजिक न्यायाची कल्पना आणि आर्थिक धोरणांवर केली जाणार आहे. विशेषतः त्यांच्या लंडनमधील शिक्षणाचा प्रभाव या विषयावर भर दिला जाणार आहे. स्वप्निल खामकर यांच्या निवडीमुळे शहरासह महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या परिषदेत जगभरातील शास्त्रज्ञ, अभ्यासक, धोरणकर्ते आणि कायदेतज्ज्ञ सहभागी होणार आहेत. प्रमुख चर्चेचे विषय आंबेडकरांचे कायदेशीर योगदान, समावेशक विकास, सामाजिक न्याय चळवळी आणि आजच्या काळातील विचार किती लागू आहेत, यावर आधारित असणार आहेत.

## सौरपंप ठेकेदाराची मनमानी ; कामाचा दर्जा निकृष्ट , शेतकऱ्याची होतेय अर्थिक लूट



> आमच्या शेतात शक्ती कंपनीचा सोलर कृषी पंप बसविला आहे. सोलर साठी लागणारे काही पॅनल जाणून बुजून बसवले नाही तर अर्थिंग च्या प्लेट आमच्याकडे उपलब्ध नाही असे सांगण्यात आले. तसेच मोबाईल ॲप वरून मोटर चालू बंद करण्याचे सिम कार्ड व किटही त्यांनी बसवली नाही. उर्वरित मटेरीयल तुम्ही घेऊन या आम्ही तुम्हाला जोडणी करून देऊ असे उत्तर कामगारांकडून मिळाले. ठेकेदाराने जोडणीही व्यवस्थित केलेली नाही. त्यामुळे अडचणी निर्माण होऊ शकतात. व्यवस्थित जोडणी करून द्या म्हटल्यावर ठेकेदारांनी अरेरावीची भाषा ही केली.
>
> **प्रमेश्वर गिते शेतकरी (गितेवाडी)**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**करंजी:** केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडून कृषी सोलर पंप बसवण्यात येतात. मात्र, या पंपाचे काम खाजगी कंपन्या घेत असून ते मनमानी पद्धतीने काम करत आहेत. शेतकऱ्यांकडून काही पैशाची मागणी केली जाते, तर काहींना लागणारे फिटिंगचे साहित्य खरेदी करायला सांगितले जात आहे. शासनाकडून कृषी योजना ही मोफत राबवली जाते मात्र खाजगी कंपन्याकडून शेतकऱ्यांची लूट करण्यात येत आहे. अशा कंपन्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी शेतकरी करत आहेत. पाथर्डी तालुक्यातील गितेवाडी येथील शेतकरी भाउसाहेब गिते यांच्या विहिरीवर सोलर बसवत असताना सोलर पंप मटेरियल साहित्य उपलब्ध नसल्यामुळे अर्धवट काम केले व पूर्ण काम करायचे असल्यास उर्वरित तुम्ही खरेदी करून आम्हाला द्या आम्ही ते फिटिंग करून देतो तसेच अर्थिंग च्या प्लेट आहे आमच्याकडे शिल्लक नाहीत असे सांगण्यात आले आमच्याकडे उपलब्ध झाल्यावर आम्ही बसून देऊ अन्यथा तुम्हाला त्या खरेदी करून स्वखर्चाने बसवावे लागतील असे उडवा उडवीचे उत्तर ठेकेदार यांनी शेतकरी गिते यांना दिले. वीज बचत होण्यासाठी शासनाकडून पंप सोलरवर चालावेत यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. मात्र, या योजनेचा ठेकेदारांनी बोजवारा उडवला आहे. शासनाकडून दिल्या जाणाऱ्या अटींचे पालन केले जात नाही. हलगर्जीपणाने सोलर पंप जोडले जात आहेत. त्याची फिटिंगही व्यवस्थित केली जात नाही. अशाच पद्धतीने शेतकऱ्यांना सोलर पंप सुरु करून दिले जात आहेत. जर एखाद्या या विषयी तक्रार केली तर त्याचा पंप या कंपनीचे कामगार मुद्दम उशिरा जोडतात. अशा पद्धतीने शेतकरी बांधवांची फसवणूक केली जात आहे.

### कामगार म्हणतात वरिष्ठांशी बोला

सोलर कंपनीच्या एका कामगाराकडे विचारणा केली असता तो म्हणाला, आमच्याकडे सोलर पंप फिटिंगसाठी लागणारे सिमेंट, वाळू कच, या गोष्टी कंपनी देत नाही. त्या द्याव्या लागतात. काही अडचण असेल तर आमच्या वरिष्ठाशी बोलून घ्या असे त्या कामगाराने सांगितले. तसेच त्याने स्वतःचे नाव सांगण्यास टाळाटाळ केली.

### विम्याची कागदपात्र दिली जात नाही

शासनाकडून काही निअम अटी घालून ही योजना राबवली आहे. मात्र, खाजगी ठेकेदार त्यांच्या सोईनुसार ही कामे करत आहेत. त्यांच्या कामांचा दर्जाही चांगल्या नाही. सोलर पंपांसाठी शासनाकडून पाच वर्षाचा विमा देण्यात आला आहे. त्याची कसलीच कागदपत्रे शेतकऱ्यांना दिली जात नाहीत. यावर स्थानिक विद्युत कर्मचारी यांचे नियंत्रण असेल तर अशा प्रकाराला कोठेतरी आळा बसेल, असे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले.

## कर्जुने खारे येथील जिल्हा परिषद शाळेतील १००१ विद्यार्थ्यांना मोफत परीक्षा पॅड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नगर )**- शालेय विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेच्या पार्श्वभूमीवर कृष्णाली फाउंडेशनच्या वतीने कर्जुने खारे (ता. नगर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत परीक्षा पॅडचे वाटप रण्यातआले. खासदार निलेश लंके यांच्या हस्ते परीक्षा पॅडचे वितरण करण्यात आले. या कार्य्रमाप्रसंगी ॲड. राहुल झावरे, अशोक रोहकले, कृष्णाली फाउंडेशनचे उपाध्यक्ष अमोल शिंदे, लोकहितवादी प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अंकुश शेळके, सचिव प्रियंका पाटील शेळके, अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके, श्रीकांत बोरुडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लांडे, कर्जुनेखारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बबन नरवडे, अलका येणारे, सुप्रिया देशमुख, वैशाली गुंडू, सविता नरोटे, मंदाकिनी शिंदे, सुमित दरंदले, देशमुख मॅडम आदी उपस्थित होते. खासदार निलेश लंके विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, शिक्षणातून देशाची सक्षम पिढी घडणार आहे. सक्षम पिढी घडविण्यासाठी कृष्णाली फाउंडेशनने उचललेले पाऊल दिशादर्शक आहे. मुलं देशाची भावी पिढी असून, त्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. प्रशांत पाटील शेळके यांच्या संकल्पनेतून घेण्यात आलेला उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशांत पाटील शेळके यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांची मदत करण्याचा नेहमी प्रयत्न असेल, शैक्षणिक क्षेत्र तसेच आरोग्य, महिला




सक्षमीकरण तसेच पर्यावरण यावर मोठ काम फाऊंडेशनचा उद्देश असल्याचे मत व्यक्त केले. कृष्णाली फाउंडेशनने हा उपक्रम हाती घेतला असून, या अनुषंगाने नगर जिल्ह्यातील आणि तालुक्यातील अनेक वेगवेगळ्या शाळांमध्ये शैक्षणिक परीक्षा पॅडचे मोफत वाटप केले जाणार असल्याची माहिती प्रियंका पाटील शेळके यांनी दिली.

## डॉ. शरद मगर यांना राष्ट्रीय वेट लिफ्टिंग स्पर्धेत सलग पाचव्यांदा सुवर्ण पदक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नगर** - अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, न्यू आर्टस्‌ कॉमर्स ॲण्ड सायन्स (स्वायत्त ) शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बाळासाहेब मगर यांनी राष्ट्रीय वेट लिफ्टिंग स्पर्धेत सलग पाचव्यांदा सुवर्ण पदक पटकाविले.बिरसा मुंडा आंतरराष्ट्रीय स्टेडियम, राउरकेला (ओडिसा) येथे पार पडलेल्या राष्ट्रीय मास्टर्स वेट लिफ्टिंग स्पर्धेत डॉ. मगर यांनी उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्ण पदकाची कामगिरी करत महाराष्ट्रला सुवर्ण पदक मिळवून दिले. ७९वजन ११६ किलो वजन त्यांनी उचलले. मगर यांनी या अगोदर गुजरात, बडोदा, केरळ, तिरुअनंत पुरम, वाराणसी, गोवा येथे झालेल्या मास्टर्स गेम्स वेट लिफ्टिंग स्पर्धेत सुवर्ण पदकाची कामगिरी केली होती.डॉ. मगर हे नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाई या खेड्यागावातील रहिवाशी असून, या खेळात अनेक खेळाडू घडवीत आहे. त्यांनी महाविद्यालतील खेळाडूंना वेट या खेळ प्रकारात प्रशिक्षण देऊन राष्ट्रीय पातळीवर नेले आहे. त्यांनी घडविलेल्या खेळाडूंनी देखील राष्ट्रीय पातळीवर शहराचे नाव उंचावले आहे. खेळाडूंबरोबर ते सुद्धा वेट लिफ्टिंग खेळाचा सराव करत मास्टर्स गेम्स स्पर्धेत भाग घेऊन नवा आदर्श निर्माण केला आहे. डॉ. मगर हे त्यांच्या महाविद्यालयिन दशेत देखील पुणे विद्यापीठाचे राष्ट्रीय खेळाडू होते. शारीरिक शिक्षिण या विषयांची शारीरिक शिक्षण व खेळ आणि वेट ट्रैनिंग हे दोन पुस्तके देखील प्रकाशित केले आहेत. तसेच ते शारीरिक शिक्षण या विषयाचे पीएच.डी.मार्गदर्शक देखील आहेत. वयाच्या ५३व्या वर्षी देखील राष्ट्रीय स्तरावरील वेट लिफ्टिंग स्पर्धेत सहभाग घेऊन सुवर्णपदक मिळवणारे डॉ. मगर विद्यार्थी, खेळाडू व समाजासाठी संदेश देतात की, उम्र को हराना है तो शौक जिंदा रखिए! त्यांच्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्रजी दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे पाटील, संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त नंदकुमार झावरे पाटील, जी.डी. खानदेशे, मुकेश दादा मुळे व विश्वस्त व सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, समन्वयक डॉ.बी.एच. झावरे, उपप्राचार्य डॉ. संजय कळमकर, डॉ. अनिल आठरे, डॉ. किसन




अंबाडे, प्रबंधक बबन साबळे, कार्यालय अधिक्षक राजू पाटील, जगन्नाथ सावळे सर्व विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक, शिक्षेतर कर्मचारी, जिमखाना विभागातील प्रा. धन्यकुमार हराळ, प्रा. धनंजय लाटे, प्रा. सुधाकर सुंबे, आकाश नढे, चौरे यांनी डॉ. मगर यांचे अभिनंदन केले.

द•ख•ल

## वादातून दोन गटात हाणामारी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : किरकोळ वादातून दोन गटात हाणामारी झाल्याची घटना गुलटेकडीतील मीनाताई ठाकरे वसाहतीत घडली. याप्रकरणी परस्परविरोधी फिर्यादीनुसार खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, दोघांना अटक करण्यात आली आहे. मारहाणीत तिघे जखमी झाले असून, पसार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. याबाबत केशव शिवशरण (वय २०, रा. मीनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी) याने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, रोहित सिंग, दर्शन सुतार, संकेत यांच्यासह पाच ते सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी रोहित सिंग याला अटक करण्यात आली असून, आरोपींविरुद्ध यापूर्वी गुन्हे दाखल झाले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. केलेल्या मारहाणीत शिवशरण, राहुल ढोणे, अक्षय कांबळे हे जखमी झाले आहेत.

## चोरलेले साडेदहा लाखांचे दागिने प्रवाशाला परत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : रेल्वे प्रवासी पिशवीतून साडेअकरा लाख रुपयांचे दागिने चोरून पसार झालेल्या चोरट्याला लोहमार्ग पोलिसांनी गजाआड केले. चोरट्याकडून जप्त दहा लाख ९३ हजारांचे दागिने नुकतेच तक्रारदार ज्येष्ठ नागरिकाला परत करण्यात आले.

सुमीतकुमार सतवरसिंह (वय ३०, रा. सुलतानपुरी, दिल्ली, मूळ रा. भवानी खेडा, हरयाणा) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत शिरीष विठ्ठलराव शितोळे ७३, रा. आनंदपूरा, देवास, मध्य प्रदेश) यांनी लोहमार्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. १३ जानेवारी रोजी शितोळे इंदूर-पुणे रेल्वेगाडीतून प्रवास करत होते.सुमीतकुमार सतवरसिंह असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत शिरीष विठ्ठलराव शितोळे यांनी लोहमार्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. १३ जानेवारी रोजी शितोळे इंदूर-पुणे रेल्वेगाडीतून प्रवास करत होते.

## कारवाईची धमकी देऊन ज्येष्ठाची फसवणूक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : सक्तवसुली अंमलबजावणी संचनालय (ईडी), नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी), तसेच केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय) कडून कारवाई करण्यात येणार असल्याची भीती दाखवून फसवणूक करण्याचे सत्र सुरू आहे. चोरट्यांनी आंबेगाव बुद्रुक परिसरातील एका नागरिकाला कारवाईची धमकी देऊन साडेसहा लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. काळ्या पैसा व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला असून, या प्रकरणात अटक करण्यात येणार आहे, अशी धमकी चोरट्यांनी त्यांना दिली. चोरट्यांनी कारवाईची भीती दाखवून तातडीने पैसे भरण्यास सांगितले. खात्यात त्यांनी पैसे जमा केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.

## मोगऱ्याची रोपे देत महिला दिन साजरा



**माळशिरस** : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्वत्र महिलांच्या सन्मानाचे होत आहेत याच पार्श्वभूमीवर सासवड येथील चिंतामणी हॉस्पिटल मधील सर्व परिचारिका व नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थिनी यांना मोगऱ्याची रोपे देत वेगळ्या स्वरूपात महिला दिन साजरा करण्यात आला. जेष्ठ महिला उद्योजिका व साई रोप वाटीकेच्या सविता किशोर संगमनेरकर यांच्या वतीने देण्यात आलेल्या या रोप वाटप कार्यक्रमासाठी डॉ संजय रावळ, डॉ विनायक डॉ संध्या खळदकर, जेष्ठ पत्रकार हेमंत ताकवले, किशोर संगमनेरकर, चित्रा हातीवलेकर आदी मान्यवर उपस्थित होते .

धन्वंतरी पूजन व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. डॉविनायक बांदेकर, हेमंत ताकवले, डॉ संध्या खळदकर यांनी या वेळी मनोगते व्यक्त केली.

## सायबर सोरट्यांकडून तिघांची ५६ लाखांची फसवणूक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणूक करण्याचे सत्र सुरू आहे. चोरट्यांनी गुंतवणुकीच्या आमिषाने वेगवेगळ्या घटनेत तिघांची ५६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने चोरट्यांनी मगरपट्टा सिटी भागातील एकाची ४५ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला.

याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध हडपसर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एकाने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण मगरपट्टा सिटी भागात राहायला आहेत. चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर गेल्या वर्षी संपर्क साधला शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले होते. चोरट्यांच्या खात्यावर तरुणाने रक्कम जमा केली. सुरुवातीला तरुणाला परतावा देण्यात आला.

त्यानंतर तरुणाने चोरट्यांच्या बतावणीवर विश्वास ठेऊन आणखी रक्कम गुंतविली. गेल्या सहा महिन्यात चोरट्यांच्या खात्यावर तरुणाने वेळोवेळी ४५ लाख ४० हजार रुपये जमा केले. तरुणाने पैसे परताावा देण्यात आला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नीलेश जगदाळे तपास करत आहेत. शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने कात्रज भागातील एकाची चोरट्यांनी सहा लाख ३० हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, वरिष्ठ पोलीस सावळाराम साळगावकर तपास करत आहेत. अशाच पद्धतीने चोरट्यांनी धनकवडी भागातील एका तरुणाची सहा लाख सात हजार रुपयांची फसवणूक केली. सहकारनगर पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गौड तपास करत आहेत.

## नदी प्रदुषण मुक्तीची चळवळ ही लोक चळवळ होणे आवश्यक : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**पुणे** : संत महात्म्यांनी आपले आयुष्य नद्या काठी घालवले असून, महाराष्ट्रातील तिर्थक्षेत्रातून वाहणाऱ्या नद्यांची परस्थिती आज बरी नाही, मी मुख्यमंत्री असताना नद्यांच्या पुनर्जीवनासाठी सुरवात केली, येवढ्या वर हे शक्य नसून नदी प्रदूषण मुक्त चळवळ आता लोक चळवळ होणे आवश्यक असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे. देहूनगरीत श्री संत तुकाराम महाराजांच्या ३७५ वा बीज सोहळा साजरा करण्यात येत आहे. या पवित्र सोहळ्यात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देहू संस्थानच्या वतीने 'श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार' प्रदान करण्यात आला यावेळी ते बोलत होते. पालखी सोहळ्यात शिंदे यांनी दिंड्यांना आर्थिक सहाय्य, स्वच्छता मोहिम आणि इतर विविध सुविधा देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांना 'श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आला आहे. यावेळी मा.राज्यमंत्री विजय शिवतारे, खासदार श्रीरंग बारणे, धर्मवीर आध्यात्मिक सेनेचे अक्षय महाराज भोसले, हभप बापूसाहेब मोरे, आळंदी देवस्थान प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथजी, देहू संस्थानचे अध्यक्ष हभप पुरुषोत्तम महाराज मोरे, विश्वस्त माणिक मोरे, भानुदास मोरे, विशाल मोरे, मोरे, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळाप्रमुख डॉ.भावार्थ देखणे, शिवसेना जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, शहरप्रमुख राहुल चव्हाण, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगांवकर आदी मान्यवर उपस्थित होते.

शिंदे यांनी आषाढीवारी दरम्यान वारकऱ्यांच्या सेवा सुविधांसाठी घेतलेल्या विशेष प्रयत्नांची निर्मल वारी, हरित वारी संकल्पनेत दिलेल्या योगदानाची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला या पुरस्कारामध्ये शिंदे यांना वैभवी शाल, वीणा, चिपळ्या, पुष्पहार, संत तुकाराम महाराज मूर्ती, संत गाथा आणि सन्मानपत्र प्रदान करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापूर्वी माजी मुख्यमंत्री शरद पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

## लाखांच्या बिलाने पळविले 'तोंडचे पाणी'

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पुणे** : एरवी शंभर-दोनशे रुपयांच्या घरात पाणीबिल भरणाऱ्या शनिवार पेठेतील एका ज्येष्ठ नागरिकाला पुणे महापालिकेने चक्क पावणेअकरा लाख रुपयांचे पाणीवापराचे बिल पाठविले आहे. मोबाइल क्रमांकावर आलेल्या या चुकीच्या बिलामुळे ७५ वर्षांच्या या ज्येष्ठ नागरिकाची झोप उडाली आहे. या प्रकारामुळे रक्तदाब वाढल्याची तक्रार त्यांनी केली त्यांनी महापालिकेकडे याबाबत विचारणा केली असता, महापालिकेने केवळ 'बघू' असे मोघम उत्तर दिले. गोविंद गोरे (वय ७५) असे ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. गोरे शनिवार पेठेत राहतात. त्यांना महापालिकेकडून मीटरने पाणीपुरवठा केला जातो. दर महिन्याला साधारण शंभर ते दोनशे रुपयांच्या दरम्यान पाण्याचे बिल त्यांना येते. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात त्यांच्या क्रमांकावर महापालिकेचे पाण्याचे बिल थकीत असल्याचा मेसेज आला. त्यांच्याकडे १० लाख ७६ हजार ५९ रुपयांचे बिल थकीत असल्याचे त्यात नमूद करण्यात आले होते. गोरे यांना आलेल्या बिलामध्ये मोबाइल क्रमांक त्यांचा असला, तरी प्रत्यक्षात नाव मात्र दुसऱ्याच व्यक्तीचे आहे. या बिलावरील पत्ता त्यांच्या जवळच्या भागातील आहे. या चुकीच्या बिलाबद्दल गोरे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार केली. मात्र, त्याची दखल घेऊन त्यांना कोणताही सकारात्मक प्रतिसाद महापालिकेने दिला नाही.या बिलाची बारकाईने तपासणी केली असता, बिलावर असलेला ग्राहक क्रमांक आपला नसल्याचे गोरे यांच्या लक्षात आले. पण, हे बिल काढताना त्यांचा मोबाइल क्रमांक टाकण्यात आल्याने बिलाची थकबाकी त्यांच्याच क्रमांकावर दाखविण्यात आली आहे.

# रॉबरीच्या गुन्ह्यातील ४ तोळे सोने केले परत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर**-कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास लावून त्यामध्ये गेलेला ऐवज हस्तगत करून फिर्यादी यांना दिल्याबद्दल पोलीस निरीक्षक प्रताप दराडे व सहकाऱ्यांचा पाठवा कुटुंबीयांनी सन्मान केला. रितेश सुरेश पटवा हे त्यांचे कुटुंबासह दि.४ डिसेंबरच्या मध्यरात्री पुणे ते पाथर्डी असे अहिल्यानगर मार्गे जात असताना त्यांना झोप येत असल्याने त्यांची इरटिगा चारचाकी गाडी ही हॉटेल कन्हैय्या समोर, नगर-पुणे रोड, केडगाव, अहिल्यानगर येथे उभी केली होती. त्यादरम्यान पहाटे ४. च्या सुमारास तीन अनोळखी चोरट्यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना झोपेतून उठवुन गाडीचा दरवाजा उघडण्यास सांगुन फिर्यादी यांची आई व पत्नी यांचे गळ्यातील सोन्याच्या दोन चेन त्यास पेंडल लावलेले असलेल्या दोन्ही अंदाजे पाऊने सात तोळे वजनाचे सोन्याचे दागिणे त्यांना मारहान करून बळजबरीने चोरी करुन नेल्या होत्या व सदर गुन्हा कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये त्यांनी दाखल केला, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे आदेशाने सपोनि योगिता कोकाटे यांनी गुन्ह्याचे तपासात गुन्हा उघडकीस आणला व यातील सोने हस्तगत केले व आरोपीना अटक केली. सदरची ही पोलीस अधीक्षक . राकेश ओला , अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे , उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, गुन्हे शोध पथकाचे स.पो.नि, योगिता कोकाटे, पो.हे.कॉ. योगेश भिंगारदिवे, विशाल दळवी, सलीम शेख, संदिप पितळे, पो.कॉ. अभय कदम, अमोल गाडे, अतुल काजळे व दक्षिण विभाग सेलचे पो.कॉ. राहुल गुंडु यांनी केली आहे. याबद्दल आज रितेश पटवा,शोभा पटवा, प्रियंका पटवा यांनी नगरमध्ये गुन्ह्याचा तपास लावल्याबद्दल कोतवाली पोलीस स्टेशन मध्ये येऊन पोलिसांचा सत्कार करून त्यांना पेढे दिले.



## धर्मशिक्षण व धर्माचरण हाच लव्ह जिहादवर उपाय : पेटकर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**भोर** : देशातील विविध भागात अनेक हिंदु युवती आणि महिला लव्ह जिहादच्या विळख्यात सापडून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. प्रत्येक हिंदु माता भगिनींनी धर्मशिक्षण घेऊन धर्माचरण केले पाहिजे आणि लव्ह जिहाद पासून सावध रहायला हवे, असे प्रतिपादन हिंदु जनजागृती समितीच्या रणरागिणी शाखेच्या क्रांती पेटकर यांनी केले. केंजळ (ता.भोर) येथे जनजागृती समितीच्या वतीने 'लव्ह जिहाद : एक भीषण समस्या' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. राजमाता जिजाऊ, महाराणी येसूबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, महाराणी पद्मावती, अहिल्याबाई होळकर अशा अनेक महिलांचा शौर्यशाली इतिहास आपल्याला लाभला आहे यातून प्रेरणा घेऊन प्रत्येक हिंदु महिलेने धर्माचरण करून आपल्यातील आत्मबल वाढवून स्वतः मधील शौर्य जागृत आवश्यक आहे. तरच लव्ह जिहाद आणि अत्याचारांच्या घटनांपासून संरक्षण करता येईल असे पेटकर यांनी यावेळी सांगितले. यावेळी १०० हून अधिक महिला, युवती आणि युवक उपस्थित होते.

## स्व.यशवंतराव चव्हाण यांची जयंती संपन्न



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मंचर** : ता. आंबेगाव येथील शरद सहकारी बँकेच्या सभागृहात आधुनिक महाराष्ट्राच्या विकासाचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनाचे आयोजन बुधवार दि. १२ रोजी आंबेगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस महिला अध्यक्षा सुषमाताई शिंदे दोन्ही महापुरुषांना अभिवादन करत कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे आयोजन आंबेगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष विष्णूकाका हिंगे पाटील व अजयराव आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमाला भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदिप वळसे पाटील, शरद बँकेचे संचालक अजय घुले, दत्ता थोरात, भिमाशंकर कारखान्याचे संचालक शिवाजीराव रामचंद्र ढोबळे, बाजार समितीचे सभापती निलेश स्वामी थोरात , उपसभापती सचिन पानसरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिरदाळे गावचे माजी उपसरपंच मयूर सरडे यांनी केले तर आभार युवक राष्ट्रवादीचे प्रशांत हिंगे पाटील यांनी मानले.

# नगरपालिकेची लक्तरे वेशीवर !

दिपक बरकसे | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर**: नगरपालिकेच्या कारभाराची लक्तरे वेशीवर टांगली असताना याकडे पुढाऱ्यांना लक्ष द्यायला वेळ आहे ना वरिष्ठ अधिकाऱ्यांना समस्या घेऊन आलेल्या अभ्यागतांच्या समस्या ऐकून न घेताच 'शब्दबंबाळ' करून पिटाळून लावले जाते. कार्यालयप्रमुखांसह बहुतांश कर्मचारी दुसऱ्या ठिकाणी राहून 'उंटावरून शेळ्या राखण्यासारखा' पालिकेचा कारभार पाहतात. एकंदरीतच पालिकेत सध्या करे सो कायदा' सुरू असून नोकरीला आले अन् पालिकेचे मालक' झाले. अशी अवस्था झाली आहे. साधारणतः दोन वर्षांपूर्वी पालिका सदस्यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर तत्कालीन मुख्याधिकारी भागवत बिघोत यांच्याकडे प्रशासक पदाची सूत्रे हाती आली. परंतु सहा महिन्यांपूर्वी त्यांची बदली झाली अन् कारभार दुसऱ्या अधिकाऱ्याचा हाती गेला. तेव्हापासून शहराला 'अवकळा' लागली खुल्या गटारींसह भूमिगत गटारी ओसंडून वाहू लागल्या आहेत. स्वच्छतेच्या नावाने बोंबाबोंब सुरू झाली आहे. अशुद्ध पाणीपुरवठा, शहराच्या चोहोबाजूंनी साचलेले कचऱ्यांचे ढीग, शहरात डासांनी मांडलेला उच्छाद, अधिकाऱ्यांची मनमानी हे आता कायमचेच झाले आहे. बाहेरून शहरात येणाऱ्यांचे स्वागत कचऱ्यांच्या ढीगाने होते. यापेक्षा बकाल अवस्था शहराची काय असू शकते? कार्यालयप्रमुख येवल्यातून अपडाऊन दुपारी १२.३० वाजता कार्यालयात यायचं. दोन वाजेपर्यंत थांबायचे अन् पुन्हा पाच वाजता पालिकेत 'आराम' करून यायचे. तोपर्यंत समस्या घेऊन आलेल्या अभ्यागतांची कंटाळून - कंटाळून 'वाट' लागलेली असते. अभ्यागतांना अधिकाऱ्याची एवढी प्रतीक्षा करावी लागत असेल तर ते कशाला थांबतील. प्रतीक्षा करूनही त्यांची समस्या तर सुटत तर नाहीच. त्याबदल्यात त्यांना



अधिकाऱ्यांकडून वागणूक मिळून 'शब्दबंबाळ' होण्याची वेळ येते. अभ्यागतांची भेट घेणे हे अगोदर अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. समस्या, प्रश्न जाणून घेणे हा नंतरचा भाग आहे. परंतु अभ्यागतांना पहिला प्रश्न पडतो की, भेटायचे कुणाला व कुठे? कारण अधिकारी 'ठिकाणा'वर नसतात. कार्यालयप्रमुखांप्रमाणेच त्यांच्या खालोखाल असणारे उपमुख्याधिकारीही छत्रपती संभाजीनगर येथे राहून कारभार पाहतात. त्यांच्याही असंख्य आहेत. कार्यालयप्रमुखांसह अन्य अधिकारीही आठवड्यातून कधीतरी हजेरी लावतात. त्यातही त्यांचा डामडौल, मग्रुरी, आडदांडपणा पाहता विचारता सोय नाही. शासनाकडून गलेलठ्ठ पगार घ्यायचा अन् कामे न करता अभ्यागतांना 'सुनावून' घ्यायचे. असंच सध्या सुरू आहे. पालिकेत सध्या समस्यांना प्राधान्य तर नाहीच. परंतु अभ्यागतांना मोठ्या युक्तिवादाला सामोरे जावे लागते. न्यायालयात एखाद्या खटल्यावर जेवढा होत नसेल तेवढा येथे होतो. अधिकारी समस्या सोडवण्याऐवजी प्रश्नांमध्ये गुरफटून अभ्यागतांना पिटाळून लावतात. त्यामुळे येणारा हेही विसरून जातो की, आपण कशासाठी आलो होतो? अधिकारी पालिकेचे मालक नव्हें तर जनतेचे नोकर असतात. याचे धडेही आता पालिकेतील अधिकाऱ्यांना देणे गरजेचे आहे. त्यामुळे पालिकेच्या कारभाराबाबत सध्या जिकडे-तिकडे चोहीकडे आनंदी- आनंद गडे' असेच येईल. हा कारभार सुधारेल. तो सुदिन उगवला म्हणायचा!

## एकाच दिवसात दोन अपघात; एक ठार, दुसरा गंभीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जुन्नर** : ओतूर आणि नगर-कल्याण रोडवर एकाच दिवसात अपघात झाल्याची घटना घडली आहे.ज्यात एका अपघातात एक जण ठार झाला आहे तर दुसऱ्या अपघातात एकाची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. पुणे जिल्ह्यातील नगर कल्याण महामार्गावरील एका पाठोपाठ एक होणाऱ्या अपघातांच्या मालिकेने नगर कल्याण हायवे मृत्यूचा सापळा बनला आहे. राज्यात रस्ते अपघात मोठी वाढ झाली असून जुन्नर तालुक्यातील बनकर येथील सकाळची अपघात घटना ताजी असतानाच नगर कल्याण महामार्गावर दुसरा भीषण अपघात झाला. महामार्गावर वेगवान धावणारी वाहने अपघातास कारणीभूत ठरत आहेत . ओतूर आळेफाटा डिंगोरे परिसरातील रस्त्यांवर दुभाजकांची गरज आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी या महामार्गाचे रुंदीकरण करण्यात आले. नगर कल्याण ओतूर परिसरात तर अपघातांची मालिका सुरू आहे. महामार्गावर वाहने वेगात असतात वेग नियंत्रित नसतो त्यामुळे रस्त्याच्या कडेला पदचारी असतात. गाव किंवा रहदारीचा परिसर आला की वाहनांचा वेग मर्यादित करणे आवश्यक असते, तसेच रस्त्याच्या कडेला कोणी आहे का? हे देखील चालकांना पाहावे लागते. मात्र बऱ्याचदा याकडे दुर्लक्ष होते अंतर लवकर पार करण्याच्या नादात अपघात घडत असल्याचे दिसून आले आहे. या गोष्टींकडे लक्ष देण्याची आणि वाहतुकीचे नियम पाळण्याची गरज आहे. नगर कल्याण महामार्गावर आवश्यक सूचना फलक स्पीड ब्रेकर बसवणे गरजेचे आहे. अलीकडच्या काळात रस्ते गुळगुळीत झाल्याने वाहनांचा वेग वाढत आहे वेगावर नियंत्रण येण्याकामी उपाय योजनांचा अभाव आहे असा सूर गर्दीतून ऐकावयास येत होता.

# तालुकास्तरीय पाककृती स्पर्धेत राशीन मुलींची शाळा प्रथम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राशीन** : प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत२०२४/२५ तालुकास्तरीय पाककृती स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा राशीन मुली यांनी कर्जत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला .

सदर योजनेअंतर्गत पंचायत समिती कर्जत शिक्षण विभागामार्फत गटशिक्षणाधिकारी प्रदीप शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय पाककृती स्पर्धा नुकतीच समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कर्जत येथे संपन्न झाली . सदर स्पर्धेमध्ये विजेते शाळा निवडण्यात आल्या सदर पाककृती स्पर्धा परीक्षण पंचायत समिती विभाग कर्जत यांचे मार्फत दोन समित्या तसेच उपजिल्हा रुग्णालय कर्जत येथील आहार समिती त्याचप्रमाणे महिला व बाल विकास



समिती कर्जत यांचीही एक समिती कार्यरत होती. सदर पाककृतीचे परीक्षण करण्यासाठी तालुकास्तरीय चार परीक्षण समिती मार्फत सर्व सहभाग घेतलेल्या १५ शाळेमधून तीन विजेत्या शाळेची निवड करण्यात आली . त्यामध्ये शालेय पोषण दशरथ धादवड , पंचायत समिती शिक्षण विभागाचे डाटा ऑपरेटर सोमीनाथ गोपाळघरे , केंद्रप्रमुख दिवेकर , राजू राऊत यांच्या सह इतर प्रशासनातील कर्मचारी अधिकारी उपस्थित होते . परीक्षण करताना ५० गुण ठेवलेले होते . त्यामधील विभागणी तांदुळाचे फायदे उपयोगिता चव मांडणी नाविन्यपूर्णता कृती सुलभता व इंधन बचत तसेच आहारातील महत्त्व अशी करून प्रत्येक बाबीसाठी दहा गुण ठेवलेले होते त्यानुसार परीक्षण होऊन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राशीन मुली या शाळेतील पाककृतीची निवड प्रथम क्रमांकाने समिती ने परीक्षण करून केलेली आहे . त्यानुसार सर्वात जास्त गुण ४५.२५% राशीन शाळेला मिळाले आहेत . राशिन केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राशीन मुली यांना क्रमांक मिळाला असून पाच हजार रुपयाचे बक्षीस जाहीर झालेले आहे . त्या कामी शाळेतील मुख्याध्यापक बापूराव वावगे यांनी योगदान दिले . तसेच पाककृती रचना व तयार करण्याकामी शाळेतील शिक्षिका शुभांगी भालेकर व सोनाली रसाळ यासह शालेय पोषण स्वयंपाकी आशा भालेराव व मदतनीस मंगल आढाव यांनी सहभाग घेतलेला होता . पंडित , रावसाहेब ढवळे , तृप्ती भापकर , शुभदा देशमुख , स्मिता गुणवरे , संतोष मुसळे या चे सह काये मिळाले . शाळेला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाल्यामुळे कर्जत तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रदीप शिंदे , माजी सरपंच नीलम साळवे , उपसरपंच शंकर देशमुख , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अतुल साळवे , जाधव , उपाध्यक्ष सपना सचिन साळवे , प्रा. किशोर कांबळे ,नवनाथ धनवे , वसीम तांबोळी ,पांडुरंग भंडारे , अजय सोनवणे व रमेश मासाळ यांनी अभिनंदन केले आहे .

* पाककृती स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या राशीन शाळेच्या शिक्षिका .

दखल

## एका दारु पिऊ न दिल्याच्या कारणातून हल्ला; पाच जखमी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :**जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील काही जणांनी शनिवारी रात्री उशिरा करंजी गावातील एका हॉटेलमध्ये दारू पिऊ न दिल्याच्या कारणातून हल्ला चढविला. या हल्ल्यात पाच जण जखमी झाले असून या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. दरम्यान हा संपूर्ण प्रकार कॅमेरामध्ये कैद झाला आहे. क्षुल्लक कारणांवरून वादावादी व हाणामारीच्या घटना सातत्याने घडत आहेत. अशाच प्रकारे अहिल्यानगर जिल्ह्यात एक घटना समोर आली आहे. यात हॉटेलवर काहीजण जेवण करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांनी हॉटेलमध्ये दारू पिण्याची तयारी केली होती. मात्र हॉटेलमध्ये दारू पिण्यास मनाई असल्याने संबंधितांना मद्य सेवन करण्यास मज्जाव करण्यात यातून त्यांनी हॉटेलमधील कर्मचाऱ्यांशी वाद घालण्यास सुरुवात केली. मद्य प्राशन करू न देण्याच्या कारणावरून संबंधितांनी हॉटेल कर्मचाऱ्यांशी वाद घातला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. तसेच काही जणांनी हॉटेलवर दगडफेक देखील केली. तर हॉटेलमध्ये प्रवेश करत येथील कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यात आली. या हाणामारीत तीन जण गंभीर जखमी झाले असून या उपचारार्थ अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले आहे.गावात सकाळपासून कडकडीत बंददरम्यान टोळक्याने केलेल्या हल्ल्यात एका जखमीचा डोळा निकामी झाला आहे. तर एका जखमीस ४५ टाके पडले आहेत. दरम्यान या घटनेनंतर खळबळ उडाली असून याचे पडसाद गावात दिसू लागले आहेत. करंजी येथील सलमान जमादार पठाण टोळीला अटक करण्याच्या आज करंजी गावात सकाळपासून कडकडीत बंद पाडण्यात येत आहे.

## गुढीपाडवा आणि ईदमुळे शिक्षकांचा पगार २८ मार्चपर्यंत करावे : मागणी



**नगर** - दि. ३० मार्च रोजी गुढीपाडवा आहे. हिंदू नववर्ष गुढीपाडव्याला सुरु होते. देशात हा सण मोठया उत्साहात साजरा केला जातो.तसेच ३१ मार्च रोजी रमजान ईद हा मुस्लिम बांधवांचा पवित्र सण आहे. गुढीपाडवा रमजान ईद हे सण लक्षात घेऊन राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच महाविद्यालयीन शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्च पेड इन एप्रिलचे पगार २८ मार्च पूर्वी वितरीत करण्यात यावेत, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे पत्राद्वारे करण्यात आल्याची माहिती शिक्षक नेते तथा शिक्षक भारती संघटनेचे राज्यसचिव गाडगे यांनी दिले.महागाईच्या काळामध्ये शिक्षकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यासाठी २८ मार्चपर्यंत शिक्षकांचे पगार करावे त्यांनी सांगितले पगार वेळेवर होण्याबाबत शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना उचित आदेश द्यावेत, अशी ही मागणी शिक्षक भारती संघटनेच्या वतीने शिक्षक भारती संघटनेचे राज्य सचिव तथा शिक्षक नेते सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष जगताप, कार्याध्यक्ष बाबासाहेब लोंढे जिल्हा सचिव विजय कराळे, सोमनाथ बोंतले जिल्हा महिला अध्यक्ष आशा मगर कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, गोरक्षनाथ गव्हाणे. उर्दू जिल्हाध्यक्ष मोहंमद समी शेख, , उच्च माध्यमिक जिल्हाध्यक्ष रामराव काळे पुणे विभागीय कार्याध्यक्ष तथा शिक्षक भरतीचे जिल्हा सचिव महेश पाडेकर पवार हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संजय पवार, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी , श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, जॉन सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, सचिव विभावरी रोकडे, कार्याध्यक्ष मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे. सोनाली अकोलकर, विनाअनुदानित च्या राज्यअध्यक्षा कुरूमकर आदींनी केली.

## संकष्टी चतुर्थीनिमित्त आव्हाणे येथे विविध धार्मिक कार्यक्रम




**ढोरजळगांव:** शेवगाव तालुक्यातील आव्हाणे बु निद्रिस्त गणपती मंदिर येथे शनिवार दि.१७ मार्च रोजी संकष्टी चतुर्थी निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.सकाळी ७ वा पैठण वरून आणलेल्या गंगेच्या पाण्याने श्रीची आरती व महाभिषेक निवृत्ती वाणी (ब-हाणपुर)यांच्या होणार असून दुपारी १२ वाजता भाविकांना फराळाची व्यवस्था निवृत्ती वाणी यांच्यावतीने करण्यात आली आहे. सायं ६ वा हभप काकासाहेब महाराज मुखेकर यांचे प्रवचन होईल.सायं ७ वा श्रीची अरती व महाभिषेक सुभाष आहेर आव्हाणे खु यांच्या हस्ते होणार आहे.रात्री ८ वा भाविक भक्तासाठी आहेर यांच्यावतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.तरी धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा,असे आवाहन निद्रिस्त गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष प्रा.मालोजी भुसारी ,सरचिटणीस अर्जुन सरपते,माजी.विश्वस्त अंकुश कळमकर,नारायण जाधव,कारभारी तळेकर,रामदास दिवटे व कार्यालयीन सचिव लक्ष्मण मुटकुळे यांनी केले आहे.

# चालू वर्षी उन्हाची तीव्रता उचांकी ; कुकडी लाभ क्षेत्रात पाण्याचा खेळखंडोबा !

## आमदारांनी कुकडीच्या आवर्तनाकडे लक्ष द्यावे शेतकऱ्यांची मागणी

नंदकुमार कुरुमकर । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** --चालू वर्षी उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामध्ये अडीच महिने उन्हाची तीव्रता आणखी उचांकी ठरणार आहे. त्यामुळे चालू वर्षीचा उन्हाळी अंगाची लाही लाही करणारा असणार . दरम्यान श्रीगोंदा तालुक्याला वरदान ठरलेल्या घोडचे आवर्तन सोडण्यात आले होते. ते मागील आठवड्यात बंद झाले. मात्र नियोजन न केल्यामुळे आवर्तनाचा खेळखंडोबा झाला व शेतकऱ्यांची भरणे तसेच राहिली श्रीगोंदा च्या आमदारांनी कुकडीच्या आवर्तनाकडे लक्ष द्यावे अशी मागणी आता शेतकऱ्यांमधून होत आहे. कुकडीचे आवर्तन गेल्या महिन्यापासून सोडण्यात आलेले आहे. ३५ दिवसाचे हे आवर्तन आहे. आवर्तन हे टेल टू हेड असे असल्याने श्रीगोंदा तालुक्यात आवर्तनाचा मात्र बोजवारा उडाला आहे. प्रत्येक उन्हाळी हंगामात श्रीगोंदा तालुक्यात पिके जळून गेल्यानंतर आवर्तन हे सूत्र ठरलेलेच आहे. त्यामध्ये १३२ मायनर मधून श्रीगोंदा तालुक्यात आवर्तन सोडण्यात आले. चार-पाच वर्षांपूर्वी १३२ मायनर २०० क्युसेस पाणी मिळालेच नाही. अधिकाऱ्यांच्या नियोजन शून्य कारभारामुळे रब्बी हंगामाचे दुसरे आवर्तन मात्र दृष्टीने डोळ्यात पाणी आणण्याचे ठरले. त्यामुळे लिंपणगाव;

> दरम्यान कुकडी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांचे म्हणण्यानुसार तालुक्याचे आमदारांकडून जनता दरबार भरविला जातो. त्यांची समस्या समजून घेतल्या जातात. मात्र जो जगाचा पोशिंदा म्हणून आवर्तन कालावधीत कुकडीचे पाणी मिळाले की नाही? याची मात्र खातर जमा केली जात नाही. एकंदरीतच राज्य सरकारच्या सत्तेतील लोकप्रतिनिधींचा अधिकाऱ्यांवर वचक नसल्याने अनेक शेतकरी आज कुकडीच्या आवर्तनापासून वंचित राहिले आहेत. तर अधिकाऱ्यांकडून प्रत्येक चारीला १२ तास आवर्तन सोडले जाते. या बारा तासांमध्ये शेतकऱ्यांचे फक्त पाण्याचे पाठच ओले झालेले दिसतात. पासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांकडून आता मात्र आसूड मोर्चाचे नियोजन करण्यात येत असल्याची माहिती शेतकऱ्यांनी सांगितली.

आवर्तन सोडण्यात येत होते. ते आता थेट ७० क्युसेस वर येऊन ठेपले आहे. त्यामुळे या मायनर मधून अत्यंत कमी दाबाने श्रीगोंदे तालुक्यातील काही भागांमध्ये शेतकऱ्यांचे फक्त पाण्याचे पाठच ओले झाले. असा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. चोराचीवाडी येथील शेतकरी संतप्त झाले आहेत. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार कुकडीचे आवर्तन हे कर्जत; करमाळाकडे पोहोचल्यानंतर येथील लोकप्रतिनिधी अगदी जातीने शेतकऱ्यांच्या बांधावर पाणी पोहोचले की नाही. याची काळजी घेतात. मात्र श्रीगोंदा तालुक्यात कुकडीच्या पाणी प्रश्न लोकप्रतिनिधींनी म्हणावे तसे लक्ष दिले नसल्याचा आरोप शेतकऱ्यांमधून होताना आहे. सद्यस्थितीला श्रीगोंदा तालुक्याच्या पायथ्यापासून कुकडीचे आवर्तन चालू असताना पाणी उशाला मात्र कोरड घशाला अशी अवस्था श्रीगोदा तालुक्यात कुकडीच्या पाण्याची स्थिती निर्माण झाल्याचे शेतकरी सांगतात. दरम्यान श्रीगोंदा तालुक्यात कुकडी लाभक्षेत्रात मोठे क्षेत्र ओलिताखाली येते. त्यामध्ये १३२ मायनर अंतर्गत दहा हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली असताना शेतकऱ्यांना प्रत्येक उन्हाळी हंगामात संघर्ष कुकडीचे आवर्तन मिळवावे लागते. हीच दुर्दैवी बाब आहे. त्यामध्ये जलसिंचन विभागाचे अधिकाऱ्यांकडून उन्हाळी हंगामात श्रीगोंदा तालुक्यात कुकडी लाभक्षेत्रात योग्य पाणी वाटपाचे नियोजन केले जात नसल्यामुळे हातात तोंडाशी आलेली रब्बी हंगामाबरोबरच उन्हाळी पिके कुकडीच्या पाण्याअभावी जळून जातात. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या फळबागांसह इतर पिकांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होते. याला जबाबदार कोण? असा देखील कुकडी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांमधून केला जात आहे. कुकडीच्या पाण्याचे हस्तांतरित केल्यामुळे आवर्तनात मोठा गोंधळ उडाल्याचे शेतकरी सांगतात. हुकूमशाही पद्धतीने शेतकऱ्यांना पाणी दिले जाते. एकीकडे पाणीपट्टी आकारणीच्या वेळी वाढीव क्षेत्र दाखवून शेतकऱ्यांच्या माथी पाणीपट्टी आकारले जाते. तर दुसरीकडे मित्र शेतात पाणीच आले नाही तर पाणीपट्टी द्यायची कडून असा सवाल कुकडी लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांमधून व्यक्त केला जात आहे. अशा या शेतकऱ्यांच्या संतप्त प्रतिक्रियांमुळे कुकडीचे पाणी श्रीगोंदा तालुक्यात पेटणार अशी चिन्हे आहेत.

वंचित शेतकऱ्यांकडून आसूड मोर्चाचे नियोजन

## शेतकऱ्यांना पाणी न मिळाल्याने पदाधिकाऱ्यांचा सामुहिक राजीनाम्याचा निर्णय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगांव:-** मुळा धरणातून सुरू असलेल्या रब्बी पिकासाठीच्या आवर्तनातून लाभार्थी शेतकऱ्यांना न मिळाल्याने स्वामी समर्थ पाणी वापर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सामुहिक राजीनाम्याचा निर्णय घेतला आहे. टेलच्या भागातील शेतकऱ्यांना पाणी मिळवून देण्यात अपयश आल्याने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी ही ुमिका घेतली आहे, याबाबतचे निवेदन त्यांनी मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील,अमरापुरचे उपविभागीय अधिकारी स्वप्निल देशमुख यांना दिले आहे.याबाबत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मुळा पाटबंधारे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,मुळा उजव्या कालव्यातून सुरू असलेल्या रब्बी पिकाच्या आवर्तनातून भातकुडगाव(ता.)शेवगाव शाखेअंतर्गत येणाऱ्या स्वामी समर्थ पाणीवापर संस्थेच्या लाभार्थी असलेल्या लोळेगाव, सामनगाव व मळेगाव (ता. शेवगाव)येथील शेतकऱ्यांनी कांदा,ऊस,भुईमूग, बाजरी व चारा पिकांसाठी रितसर पाणी पट्टी भरून पाणी मागणी केलेली आहे. आवर्तन सुरू होऊन पंधरा दिवसाचा कालावधी उलटून गेला आहे, टू हेड पध्दतीने प्राधान्याने भरणा मिळणे आवश्यक असताना वरच्या हेडच्या भागातील हस्तक्षेपामुळे पूर्ण क्षमतेने पाणी मिळालेले नाही.त्यामुळे संस्थेअंतर्गत तीन गावातील ५०हेक्टरचा भरणा अद्यापही बाकी आहे. मात्र पाच दिवसापासून पाणी पूर्ण खंडित करण्यात आलेला आहे.याबाबत पाटबंधारे विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही तो सुरळीत करण्यात आलेला नाही. रितसर पाणीपट्टीचा पाटबंधारे विभागाकडे भरणा रोटेशनच्या आवर्तनाबाबतच्या गलथान कारभारामुळे शेतकऱ्यांना पाणी मिळालेले नाही. त्याचा शेतकऱ्यांचा रोष संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर येत आहे. त्यामुळे दोन दिवसात पाणी न मिळाल्यास शेतकऱ्यांच्या प्रती जबाबदारीचे भान ठेवून व मुळा पाटबंधारे प्रशासनापुढे हतबल होऊन सर्व पदाधिकारी आपल्या पदाचे सामुदायिक राजीनामे सुपूर्द करणार आहेत व त्यापुढील शेतकऱ्यांच्या रोषास संबंधित आपले कार्यालय जबाबदार इशारा देखील त्यांनी निवेदनात दिलेला आहे. निवेदनावर संस्थेचे अध्यक्ष गोकुळ पठाडे,सचिव नामदेव तागड यांचेसह सरस्वती काळे,नारायण घुगरे,भास्कर कळकुंबे,सिताराम देशमुख,तुकाराम ठुबे,दिगंबर देवढे,भाऊसाहेब घुगरे आदी संचालकांच्या सह्या आहेत.

## हरेश्वर संस्थान ते पैठण पायी दिंडी चिचोंडी येथे स्वागत



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** श्री संत मच्छिंद्रनाथ भाऊ हरेश्वर संस्थान डमाळवाडी या दिंडीचे प्रस्थान आज सकाळी नऊ वाजता हरेश्वर येथून झाली त्या दिंडीचे स्वागत चिचोंडी येथे फटाक्याच्या आतिषबाजीने व महिलांनी काढलेल्या आकर्षक रांगोळीने भव्य दिव्य स्वागत करण्यात आले.

यावेळी चिचोंडीचे युवा सरपंच श्रीकांत आटकर, उपसरपंच इब्राहिम ,ग्रामपंचायत सदस्य आबा गरुड, गीतेवाडी चे सरपंच जनार्दन गीते ,उपसरपंच डॉक्टर रामेश्वर गीते, प्रगतशील शेतकरी ठकाजी गीते, उद्योगपती विठ्ठल पालवे, सुनील गीते, बाळासाहेब गीते, तुळशीदास पालवे महाराज, मेजर बाबासाहेब आव्हाड, मेजर रणजीत मिलके, संतोष पालवे, रमेश फुलमाळी, पत्रकार रमेश पाथरकर यांनी दिंडीचे स्वागत केले .

भगवान महाराज मचे यांच्या दिंडी जवखेडे अमरापूर सुसरे खरडगाव डाकू निमगाव या मार्गाने दिंडी पैठण येथे जाईल या दिंडी सोहळ्यामध्ये दररोज रात्री भजन कीर्तन भारुडे असा कार्यक्रम असे व २९ तारखेला काल्याच्या दिवशी भगवान महाराज मच्छी हरेश्वर संस्थान यांचे सुमधुर वाणीतून कीर्तनरुपी सेवा होईल त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात येईल या दिंडीमध्ये भाविक भक्त संख्येने सहभागी झाले आहेत.

## भारताच्या विविधतेत वेशभूषा महत्त्वाची : कविता आव्हाड



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी:** पारंपारिक वेशभूषा ही भारताच्या समृध्द सांस्कृतिक वारशामध्ये आणि विविध सामाजिक परंपरांमध्ये खोलवर रुजलेली आहे.ही वेशभूषा देशाच्या सांस्कृतिक एक भाग असून देशाचा इतिहास आणि सामाजिक जीवन दर्शवितात.पाश्चात्य संस्कृतीचे खुळ डोक्यात घेऊन तिचे अंधानुकरण करणाऱ्या आजच्या युवापिढीला देशातील पारंपारिक वेशभूषेबद्दल माहिती करून देणे आवश्यक आहे.भारतात विविधतेत एकता आहे आणि त्याचे द्योतक ही वेशभूषा स्पर्धा असल्याचे प्रतिपादन मैत्रेयी ग्रुपच्या अध्यक्षा कविता आव्हाड यांनी केले. येथील अभय आव्हाड सामाजिक प्रतिष्ठान मैत्रेयी ग्रुपने पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेली पारंपारिक वेशभूषा व पाककला स्पर्धा उत्साहात संपन्न झाली.

कार्यक्रमासाठी अध्यक्षा कविता आव्हाड,सीमा लाहोटी,दिपाली बिहाणी,माजी उपनगराध्यक्षा दिपाली बंग,डॉ.मनीषा खेडकर,प्राची आव्हाड,प्रगती बडे,डॉ.आरती जायभाय,डॉ मनीषा ले,डॉ. अंबिका वाघ,डॉ.शुभांगी गर्जे,मनीषा घुले उपस्थित होत्या.यावेळी विद्यार्थिनीनी राजमाता जिजाऊ,अहिल्याबाई गांधी, शिवरायांचा मावळा,सिंधुताई सपकाळ आदी महिलांच्या तसेच दाक्षिणात्य, महाराष्ट्रीयन, बंगाली आदी प्रादेशिक वेशभूषा सादर केल्या. वेशभूषा स्पर्धेत सर्व मुलीनी पारंपारिक वेशात रॅम्प वॉक केला.वेशभूषा स्पर्धेत शिशु गटापासून ते महाविद्यालयीन युवती अशा ८५ विद्यार्थिनीनी सहभाग घेतला.पाककला स्पर्धे साठी शहरातील ६० महिलांनी सहभाग घेतला.वेशभूषा स्पर्धे चे परीक्षण सीमा लाहोटी यांनी तर पाककला स्पर्धेचे परीक्षण दिपाली बिहाणी केले.वेशभूषा स्पर्धेत शिशु गट प्रथम क्रमांक सई साखरे,पहिली ते पाचवी प्रथम क्रमांक स्वरांजली नरोटे, सहावी ते दहावी श्रेया दौंड तर महाविद्यालय गटात शिवकन्या खेडकर हिने प्रथम क्रमांक मिळविला.पाककला स्पर्धेत प्रथम क्रमांक राखी लुणावत,द्वितीय क्रमांक दीप्ती बाहेती व मोनिका गुगळे तर तृतीय क्रमांक कोमल तारापुरे, नीता जिरेसाळ व जयश्री बाफना यांना देण्यात आला.

उत्तेजनार्थ बक्षिसे शीतल घोरतळे, स्नेहल उरणकर,प्रतिभा देशमुख,माधुरी सरोदे,सुनंदा मरकड यांना देण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सुरेखा चेमटे,सुत्रसंचालन डॉ.वैशाली आहेर तर आभार डॉ.आशा पालवे यांनी मानले.

## प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट आणि पुनर्विकास प्रकल्पामुळे विकासास चालना : इंजि. प्रकाश जैन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो अहील्यानगर आणि पोलाद स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने इंजि. प्रकाश जैन यांचे पुनर्विकास प्रकल्पात प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सी यांचे इमारतींचा पुनर्विकास या विषयावर हॉटेल सुखसागर येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी बोलताना प्रकाश जैन यांनी म्हणाले की पुणे मुंबई यांच्या धर्तीवर आता नगर शहरात पुनर्विकास प्रकल्पाच्या कामात वाढ होत आहे. या माध्यमातून प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट यांची नेमणूक करून काम केल्यास आपला बांधकाम प्रकल्प योग्य पद्धतीने, कोणतीही फसवणूक न होता, पैशाचा योग्य विनिमय शिस्तबध्द तसेच मूळ सभासदांना वाढीव क्षेत्र व अधिक मोबदला रक्कम मिळू शकते आणि हे सर्व राज्य सरकारने दिलेल्या मार्गदर्शक तत्व्यांच्या अधीन राहून शक्य असल्याचे नमूद केले.इंजि.प्रकाश जैन म्हणाले की पुनर्विकास केल्याचा फायदा काय आहे, पुनर्विकास म्हणजे नेमके काय ? बांधकाम दुरुस्ती आणि पुनर्विकास यामधील फरक, एख्याद्या सोसायटी/अपार्टमेंट चा नेमका कधी करावा ? पुनर्विकास बाबत आवश्यक सूचना, पुनर्विकासाचे प्रकार, स्व पुनर्विकास म्हणजे काय ? याविषयी सविस्तर माहिती दिली. एखाद्या



अपार्टमेंट मधील फ्लॅट धारक एकत्र येऊन विकासकाच्या मदतीने तसेच नवीन नियमाने वाढीव एफ.एस.आय चा वापर करून त्या भागातील प्रचलित नियमांना धरून पुनर्विकास करू शकतात. पुनर्विकास करत असताना त्या संदर्भात मधील सभासदांची मीटिंग घेणे, योग्य व माहितगार झचउ ची नेमणूक करणे, जागेचे सर्वेक्षण करणे आणि संबंधित कागदपत्रे जमा करणे, टेंडर प्रोसेस आणि पेपर न्युज, आलेल्या टेंडरची छाननी, विकसकाची निवड, डेव्हलमेंट ॲग्रिमेंट, प्लॅन फायनल करणे, प्लॅन मंजुरी, फ्लॅट अल्लोटमेंट, इमारतीचे मूल्यांकन, रेरा नोंदणी, बांधकामास सुरुवात, प्रत्येक स्टेज साठी टेस्ट रिपोर्ट, पूर्णत्व झाल्यावर संबंधित विभागाचा दाखले घेऊन नवीन होणाऱ्या सोसायटी ला जमा करणे आणि फ्लॅट धारकास ताबा देणे हे टप्पे पुनर्विकासात येत असल्याचे त्यानी सांगितले. सुरुवातीस दिवंगत स्व. जवाहर मुथा यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या मीटिंगसाठी पोलाद स्टील कंपनीचे सुशांत व्हाणे, आदेश गूंगे तसेच एसा अध्यक्ष आदिनाथ उपाध्यक्ष विनोद काकडे, भूषण पांडव, यश शहा, संतोष खांडेकर, मयुरेश देशमुख, सुनिल औटी, अविनाश कुलकर्णी, दत्तात्रय शेळके, सचिन डागा, नंदकिशोर घोडके, वैभव देशमुख, संजय चांडवले, संजय पवार, ओमकार म्हसे, रवी माने आणि इतर सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रदीप तांदळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर सचिव अभिजित देवी यांनी आभार मानले.

## पिंपळगाव रोठा श्री क्षेत्र कोरठण येथे पानिपतच्या वीराची मिरवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर** - पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील जाधव परिवार यांच्या वतीने होळीचे पूजन करून कुटुंब प्रथेनुसार वीराची वाजत-गाजत मिरवणूक काढली. वीराची मिरवणूक काढण्यामागे ज्यांना वीरमरण आले; त्यांना वीर म्हणतात , इतिहासात ज्या वेळी पानिपतचे युद्ध झाले त्यावेळी महाराष्ट्रातून बर्याचशा घरातून युद्धासाठी सैनिक म्हणून जी व्यक्ती गेली व मरण पावली त्यांना वीर म्हटले गेलं. आज-काल शहीद जवानांना ज्याप्रमाणे गावात महत्त्व दिले जाते,त्यांचे पुतळे बनवले जातात, त्याचप्रमाणे काळी वीरमरण आलेल्या व्यक्तींच्या गावात नदीकाठी मूर्ती बनवून स्थापित केल्या जात. तसेच घरातील देवघरात टाक बनवून त्यांची विधीवत पूजा अर्चा केली जाते. महाराष्ट्रात नाशिक मधून जास्त वीर पानिपत युद्धासाठी गेले होते. होळीच्या दुसर्या दिवशी पानिपतची लढाई झालेली होती असे म्हणतात म्हणूनच




पिंपळगाव रोठा येथील जाधव परिवार यांच्या वतीने होळीचे पूजन करून प्रथेनुसार गावातून वीराची वाजत-गाजत मिरवणूक काढली. श्री छत्रपती संभाजी महाराज पेहराव केलेला मल्हार संतोष जाधव हा बालक सर्वांचे आकर्षण ठरला.

आपण उपासकरू जेवू त्या दिवशी घालतो. सैनिकाच्या आवडी वीर काढणे, त्यांच्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न या दिवशी केला जातो. अविवाहित किंवा ज्यांचे लग्न जमले होते परंतु वीर मरण आल्यामुळे त्यांचे लग्न होऊ शकले नाही अशा वीरांच्या मूर्तीला देव मानून बाशिंग वाहण्याची प्रथा नाशिक ध्ये अजूनही चालू आहे. काही वीर नवसाला पावणारे आहेत. हा सण व ब्राह्मण लोक देखील वेगळ्या पद्धतीने साजरा करतात अशा पद्धतीने हा होळी पूजन नंतर सण मोठ्या उत्साहात सालाबादप्रमाणे साजरा केला जातो अशी माहिती श्री. संतोष जाधव यांनी दिली. पिंपळगाव येथे हा उत्सव अतिशय उत्साहात वाजत-गाजत पार पडला. होळी पौर्णिमेनिमित्त कोरठण खंडोबा येथे पालखी छबीना मिरवणुक काढण्यात आली. या उत्सवाचे आकर्षण श्री छत्रपती संभाजी महाराज पेहराव केलेला मल्हार संतोष जाधव हा बालक सर्वांचे आकर्षण ठरला.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

सोमवार, दि.१७ मार्च २०२५ | अहमदनगर | पान नं. ८

# बचतगटांच्या उत्पादनासाठी 'उमेद मॉल' सुरू करणार

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची घोषणा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर** : बचत गटानी उत्पादीत केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी पुण्यश्लोक अहील्यादेवी होळकर यांच्या नावाने उमेद मॉल सुरू करण्याची घोषणा जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.जिल्हा नियोजन व विकास समितीच्या साह्ययाने तालुका स्तरावरही असे मॉल सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हा परिषद अहील्यानगर आणि उमेद महाराष्ट्र जीवन्नोती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने महीला बचत गटांच्या उत्पादित मालाचे विभागीय स्तरावरील साईज्योती सरस प्रदर्शनाचे उद्घाटन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर प्रकल्प संचालक राहूल शेळके अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ विनायक देशमुख निखिल वारे आदि याप्रसंगी उपस्थित होते. या प्रदर्शनात ३१५ महीला बचत सहभागी झाले असून, वस्तू विक्रीचे १२० स्टॉल खाद्य पदार्थाचे ८५ स्टॉल जळगाव धुळे नासिक नंदुरबार






छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील ४० स्टॉल आहेत. उमेद योजनेतून मंजूर झालेल्या अनूदानाचे तसेच कर्जाच्या धनादेशाचे वितरण बचत गटांना मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की,पुण्यशलोक अहील्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी वर्ष सुरू असताना विभागीय प्रदर्शन या जिल्ह्यात होणे हा मोठा योगायोग आहे.नारीशक्तीला विधायक कार्याकडे वळविण्यासाठी बचत गटाची चळवळ सुरू झाली.महीलांच्या अर्थिक सक्षमीकरणाचे मोठे काम झाले असून हजारो रुपायात होणारी अर्थिक उलाढाल आता लाखो रूपयापर्यत गेली गेली आहे. बॅकाकडून घेतलेल्या कर्जाचा शंभर टक्के वसूल बचत गटाचा असून केवळ विश्वासार्हतेवर चळवळीने मझठे यश मिळवले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने घेतलेल्या धोरणामुळे महीलांमधील उद्यमशीलता मोठ्या प्रमाणात वाढली आहे.यामुळे महीलांमध्ये नवी उमेद निर्माण झाली. झिरो बॅलन्सवर बॅकामध्ये खात उघडण्याची संधी मिळालेल्या महिलांना लखपती दिदि बनवून अर्थिक उत्पन्नाचा मार्ग प्रधानमंत्र्यांनी मिळवून दिले. बचत गटांना त्यांच्या उत्पादित मालाची विक्री करण्यासाठी एक केंद्र असावे म्हणून महायुती सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा स्तरावर उमेद भवन उभारण्याचे धोरण घेतले आहे.अहील्यानगर येथे त्यांच्या नावानेच उमेद भवन उभारून बचत गटांना संधी देण्यात येईल टप्प्या टप्प्याने तालुका स्तरावर उमेद भवन उभारण्याचा मानस मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी आपल्या भाषणात जिल्ह्यात महीला बचत गट आणि उमेद योजनेतून सुरू असलेल्या कामाची माहीती दिली. मंत्री विखे पाटील यांनी बचत गटांच्या स्टॉलला भेटी देवून महीलांशी संवाद साधला.उत्पादित मालाच्या प्रक्रीयेची माहीती त्यांनी जाणून घेतली.

# मातंग समाजाच्या तरुणास मारहाण केल्याच्या निषेधार्थ रिपाईचा मोर्चा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : येथील एका फुल भांडार विक्रेत्याने साईभक्ताला दोनशे रुपयांचा माल नऊशे रुपयांना विकल्याचे निदर्शनास येताच शिर्डीतील काही तरुणांनी त्याला व पोलिसाच्या हवाली केले होते. मात्र त्यावेळी आरणे नामक मातंग समाजातील मुलाला दांडक्याने मारहाण करून जातिवाचक अपशब्द वापरून त्यास अपमानित केले या आरोपावरून रिपब्लिकन पार्टीच्यावतीने शिर्डी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढून घटनेचा निषेध करण्यात आला. केला आहे. कानिफनाथ चौकातील एका फूल प्रसाद विक्रेत्याने एका साईभक्तास हार-प्रसादाचे ताट विकले होते. साईभक्त ते ताट मंदिरात घेऊन जात असताना त्यांच्याकडे काहीजणांनी चौकशी केली. हार प्रसादातेच



` ९०० रुपयाना घेतल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत संशय आल्याने काही रुणांनी जेथून हे खरेदी केले तेथे जात त्या दुकानदारास जाब विचारला व शिर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सतिश दिघे व शिडीचे पोलिस निरीक्षक रणजीत गलांडे यांना बोलावून घेतले व विक्रेत्याला पोलिसांचे ताब्यात दिले तर दिघे यांनी दुकान सील केले होते पोलीसांनी तरुणावर गुन्हा दाखल केला.

जादा भावाने माल विक्री करणाऱ्या दुकानावर काही तरुणांनी धुडगूस घालत मागासवर्गीय लोकांना टार्गेट करत मारहाण करून जातीचा उल्लेख करत अपमानित केले. या कारणावरून धुडगुस घालणाऱ्या तरुणांवर ॲट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाच्यावतीने पोलिस ठाण्यावर मोर्चा काढून निवेदन दिले.

यावेळी जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, युवक जिल्हाध्यक्ष पप्पू बनसोडे, मातंग आघाडीचे जिल्हाध्यक्ष वायदंडे , माजी नगरसेवक सुरेश आरणे, तालुका अध्यक्ष धनंजय निकाळे यांच्यासह शेकडो दलित समाजातील नागरीक सहभागी झाले होते. गलांडे यांनी निवेदन स्वीकारले. भक्तांना ज्यादा भावाने माल विकणे हा गुन्हा आहे. आम्ही त्याचे अजिबात समर्थन करणार नाही. जे लोक असे करतील त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई करायलाच पाहिजे. परंतु या धुडगुस घालणाऱ्या तरुणांना कायदा हातात घेण्याचा काय अधिकार? ज्या दुकानात हा प्रकार झाला त्या दुकानपासून मार्केटमधील इतर दुकानावर जात नाव विचारून मागासवर्गीय दुकानदारांना त्रास देण्याचा अधिकार यांना कुणी दिला, असे प्रश्न निवेदनातून विचारण्यात आले आहेत. जातीयवाद करणाऱ्यांवर दोन दिवसांत गुन्हे दाखल न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा कार्यकर्त्यानी निवेदनाद्वारे दिला. रिपाईचे थोरात, बनसोडे, वायदंडे आरणे यांनी दिला आहे.

# रिपाईच्या भूमिकेविरोधात ग्रामस्थांचा प्रतिमोर्चा

## जातीयवादाचा रंग देण्याचा प्रयत्न करू नये

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : साई भक्ताच्या हार प्रसादामध्ये लूट झालेल्या प्रकाराला आणखी नवीन वळण लागले असून रिपब्लिकन पार्टीच्या कार्यकर्त्यांनी काल दुपारी शिर्डी पोलिस ठाण्यात मोर्चा काढून काही लोकांनी मागासवर्गीय तरुणास जातीवाचक शिवीगाळ व मारहाण झाल्याच्या आरोप करत शिर्डी पोलीस ठाण्यात ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल व्हावा अशी मागणी केली होती.



त्यास प्रत्युतर म्हणून शिर्डी ग्रामस्थांनी रात्री उशिरा पोलिस ठाण्यावर मोर्चा काढला व या घटनेस जातीयवादाचा रंग देऊ नये अशी मागणी करत शिर्डी पोलिसांना निवेदन दिले आहे. ज्या काही लोकांनी जातिवाद झाला असा आरोप केला आहे तो धादांत खोटा आहे. असा कुठलाही प्रकार झालेला नाही व कुणी जातीबद्दल अपशब्द वापरले नाही, असे निवेदनातून स्पष्ट करण्यात आले आहे. हा जो काही ग्रामस्थावर आरोप केला जात आहे हा अतिशय चुकीचा असून या प्रकरणाला जातीयतेचा रंग देण्याच प्रयत्न केला जात आहे.

ना. राधाकृष्ण विखे यांनी फक्त आदेश दिले आहे की अशा प्रकारचे काही लोक असल्यास व साईभक्तांची लूट झाल्यास ग्रामस्थांनी निर्णय घ्यावा तसा निर्णय आम्ही काल घेतला. यात आमची कुठलीही चक नाही. सदर दुकानावर कारवाई करताना मुख्याधिकारी सतीश दिघे व पोलिस निरीक्षक रणजीत गलांडे हे उपस्थित होते. तेव्हा तथाकथित लोकांनी जातीयवादाचा केलेला आरोप हा चुकीचा असून दबाव टाकण्याचा प्रयत्न करू नये अशी मागणी यावेळी करण्याता आली. पोलिसांनी हे निवेदन स्वीकारले. मोर्चामध्ये प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते, मा. नगराध्यक्ष शिवाजी गोंदकर, भाजपाचे सचिन शिंदे, शिवसेनेचे सचिन कोते, माजी नगरसेवक सुजित गोंदकर, नितीन शेळके, गोपीनाथ गोंदकर, विजय जगताप, जगन्नाथ गोंदकर, आप्पासाहेब कोते, ताराचंद कोते यांचेसह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

# तरुणांमध्ये हाणामारी, १३ जणांवर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : बस स्थानकासमोर असलेल्या हॉस्पिटल समोर सोनई व ब्राह्मणी येथील तरुणांच्या गटात हाणामारी झाल्या प्रकरणी १३ तरुणावर सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांनी गुन्हा दाखल केला. या संदर्भात माहिती अशी, काल सकाळी दहाच्या सुमारास डॉ. बारगळ हॉस्पिटलच्या समोर अचानक सोनई व ब्राह्मणी येथील तरुणाचा जमाव एकत्र येऊन सार्वजनिक ठिकाणी हाणामारी शिवीगाळ आरडा ओरड करून सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तात्काळ काही जणांनी पोलीस ठाण्याला फोन करून सदर घटनेविषयी माहिती दिल्याबरोबर सोनई पोलीस प्रशासन पथक हजर झाले.

परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी त्यांना सौम्य लाठीमार करावा लागला. या हाणामारी दरम्यान विना नंबर प्लेट असलेली नवीन शाईन मोटरसायकल जप्त करण्यात आली. सदर प्रकरणातील गुन्हा दाखल झालेली नावे समर्थ संजय तारडे, विनायक विठ्ठल पाटोळे, गणेश भानदास जाधव, कृष्णा पाटोळे( पूर्ण नाव माहित नाही,) गणेश सुभाष बनसोडे, अविनाश राजेंद्र पाटोळे, अक्षय दिलीप जाधव, रेहान शेख( पूर्ण नाव माहित नाही), सार्थक संजय तारडे (सर्व रा, ब्राह्मणी, ता. राहुरी), व प्रकाश एकनाथ तागड, प्रमोद गणेश ढोबळे, मोहित ढगे (पूर्ण नाव माहित नाही), आदित्य दहिफळे( पूर्ण नाव माहित नाही ) (रा.सोनई ता.नेवासा) याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सोपोनी विजय माळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल बाचकर करत आहेत.

# मुंबई इंडियन्सने मिळवले दुसऱ्यांदा विजेतेपद



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : मुंबई इंडियन्सने शानदार कामगिरी करताना महिला प्रीमियर लीग २०२५ जिंकली आहे. १५ मार्च शनिवारी ब्रेबॉर्न स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या फायनलमध्ये मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ८ धावांनी पराभव केला. फायनलमध्ये मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सला विजयासाठी १५० धावांचे आव्हान दिले होते. मात्र त्यांना ९ बाद १४१ धावाच करता आल्या. हरमनप्रीतच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सने दुसऱ्यांदा विमेन प्रीमियर लीगचा खिताब जिंकला आहे. याआधी त्यांनी थझङ्चा पहिला खिताबही जिंकला होता.

हा २०२३मध्ये आयोजित करण्यात आला होता. दुसरीकडे दिल्ली कॅपिटल्स संघाला सलग तिसऱ्यांदा फायनलमध्ये पराभवास सामोरे जावे लागले. थझङ्चा दुसरा हंगाम रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिल्ली कॅपिटल्सला हरवत आपल्या नावे केला होता. फायनल सामन्यात आव्हानाचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सचे ठराविक अंतराने विकेट पडत होते. एकवेळेस दिल्लीची धावसंख्या ६ बाद ८३ झाली होती.

ते मोठ्या पराभवाच्या दिशेने जात होते. मात्र दक्षिण आफ्रिकेची ऑलराऊंडर मारिजाने कॅपने तुफानी खेळी करत सामना रोमहर्षक वळणावर ठेवला. दरम्यान, १८व्या शतकांत नेट सायवर ब्राँट नेक कॅपला बाद केले आण दिल्लीच्या आशा मावळल्या. मुंबईकडून नेट सायबवर ब्रँटने सर्वाधिक तीन विकेट मिळवल्या. तर एमोलिया केरला दोन बळी मिळवता आले.

# निळवंडे धरणातून प्रवरा नदीत १७०० क्युसेक्स विसर्ग सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अकोले** : तालुक्यातील निळवंडे धरणातून सध्या १७०० क्युसेक्स वेगाने प्रवरा नदीत पाणी सोडले जात आहे. गेल्या महिन्यापासून सुरू असलेले रब्बी हंगामाचे दुसरे आवर्तन कायम ठेवण्यात आले असून या विसर्गामुळे शेती आणि पिण्यासाठी पाणीपुरवठ्याला मदत होणार आहे. नदीच्या शेवटच्या टोकापर्यंत १४ बंधारे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. भंडारदरा धरणात ८५६३ दशलक्ष घनफूट तर निळवंडे धरणात २४९६ दशलक्ष घनफूट पाणी शिल्लक आहे. मात्र मार्चच्या प्रारंभीच तापमान झपाट्याने वाढू लागले आहे. त्यामुळे जलपातळीत वेगाने घट होत आहे. हरिश्चंद्रगड, कळसूबाई, भंडारदरा, निळवंडे आणि आढळा धरण पाणलोट क्षेत्रात गेल्या वर्षी समाधानकारक पाऊस झाला असला तरी उन्हाच्या झळांनी जलसाठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. तालुक्यातील कळंब, मन्हाळे, मुथाळणे, देवठाण, केळी ओतूर आणि घोडेवाडी परिसरात टंचाई निर्माण झाली आहे. अनेक गावांमध्ये विहिरींनी तळ गाठला असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अंतरावर जावे लागत आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीला अशी स्थिती निर्माण झाल्याने येत्या महिन्यांत पाणीटंचाईची समस्या अधिक गंभीर होण्याची भीती आहे. लाभक्षेत्रातील टंचाई कमी करण्यासाठी भंडारदरा वीज निर्मितीसाठी ८३० क्युसेकने आणि निळवंडे धरणातून १७०० क्युसेकने पाणी प्रवरा नदीत सोडले जात आहे. त्यामुळे शेतीला आणि पिण्याच्या पाण्यासाठी काहीसा दिलासा मिळणार आहे. नदीकाठच्या गावांना याचा थेट फायदा होणार असून शेतीच्या सिंचनासाठीही काही प्रमाणात मदत मिळेल. तालुक्यातील विविध धरणांमध्ये जलसाठा वेगाने कमी होत आहे. आढळा धरणात ७२८ दशलक्ष घनफूट पाणी उपलब्ध आहे. पिंपळगाव खांडमध्ये २६०.२९ दशलक्ष घनफूट तर टिटवी धरणात १९८.९६ दशलक्ष घनफूट पाणीसाठा आहे. सांगवी, शिळवंडी, अंबित, देवहंडी आणि बलठण यांसारख्या धरणांमध्येही जलसाठा घटू लागला आहे. मार्च महिन्यात उन्हाचा कडाका अधिक वाढणार असल्याने धरणातील जलपातळी वेगाने कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने योग्य पाणी नियोजन करणे गरजेचे आहे. टंचाईग्रस्त भागांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची योजना आखावी लागणार आहे. तसेच पुढील काळात पाणीटंचाई वाढू नये यासाठी जलसंधारणाच्या उपाययोजना तातडीने राबवणे आवश्यक आहे.

